सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १३९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## 58 लाख कुणबी नोंदींचा डेटा सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द

### 1 हजार 509 पैकी 1 हजार 373 गुन्हे मागे, एकट्या मराठवाड्यात साडेतीन लाख प्रमाणपत्रे वितरित झाल्याची शासनाची माहिती

**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत आतापर्यंत केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीची सविस्तर आकडेवारी बुधवारी जाहीर केली. मराठवाड्यात सुमारे साडेतीन लाख प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून, ५८ लाख नोंदींचा डेटा डिजिटल स्वरूपात जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती सरकारच्या शिष्टमंडळाने पत्रकार परिषदेत दिली. तसेच १० ते १७ सप्टेंबरदरम्यान 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' राबवून पात्र नागरिकांच्या अर्जांची प्रक्रिया गतीने पूर्ण केली जाणार आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मंत्री उदय सामंत यांनी ही भूमिका मांडली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळातील गायकवाड आयोग आणि त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या १० टक्के एसईबीसी आरक्षणाचा उल्लेख करण्यात आला. इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला न्याय देण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जुन्या महसूल नोंदींच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या माध्यमातून आतापर्यंत मराठवाड्यात साडेतीन लाख दाखले देण्यात आले आहेत. तसेच ५८ लाख नोंदींचा डेटा पेनड्राइव्हद्वारे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. या प्रक्रियेत नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र 'मराठा कक्ष' स्थापन करण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यात 'नोडल अधिकारी' नेमण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटनुसारही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत ३ हजार ५०० अर्ज प्राप्त झाले आहेत.

याशिवाय, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याच्या मागणीवर बोलताना सरकारने स्पष्ट केले की, आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या १ हजार ५०९ गुन्ह्यांपैकी १ हजार ३७३ गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. उर्वरित १०८ प्रकरणांची चौकशी सुरू आहे. सरकारने आपले निर्णय आणि मसुदा सादर केला असून, आता आंदोलनकर्त्यांच्या भूमिकेवर पुढील दिशा अवलंबून असणार आहे.

### 'थॅलॅमस व्हेंचर्स'चा गौरव

**पुणे :** भारतातील आघाडीची वैद्यकीय उपकरणे निर्मिती करणारी कंपनी आणि बीपीएल समूहाचा ५० वर्षांचा समृद्ध वारसा असलेल्या 'बीपीएल मेडिकल टेक्नॉलॉजीज'ने 'बीपीएल एलेव्हेट २०२६' या वार्षिक सन्मान सोहळ्यात 'थॅलमस व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड'चा गौरव केला.व्यावसायिक प्रगती, ग्राहकांशी दृढ संबंध आणि आरोग्यसेवा वितरण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या वितरण भागीदारांचा सन्मान करण्यासाठी 'बीपीएल एलेव्हेट' हे व्यासपीठ आयोजित केले जाते.

### 2026 मध्ये 32,842 युनिट्सची विक्री

**बंगळुरू:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज ऑगस्ट २०२६ महिन्यातील विक्री कामगिरी जाहीर केली असून कंपनीने एकूण ३२,८४२ युनिट्सची विक्री नोंदवली आहे. यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेत विक्री झालेल्या २८,४१० युनिट्सचा तसेच ४,४३२ युनिट्सच्या निर्यातीचा समावेश आहे. कॅलेंडर वर्ष २०२६ मध्ये जानेवारी ते ऑगस्ट या कालावधीत टोयोटा किर्लोस्कर मोटरने एकूण २,६६,६९६ युनिट्सची विक्री नोंदवली, तर २०२५ मध्ये याच कालावधीत एकूण २,४१,७३३ युनिट्सची विक्री झाली होती. यामुळे कंपनीच्या एकूण विक्रीत १०% वाढ झाली आहे. जानेवारी ते ऑगस्ट २०२६ दरम्यान देशांतर्गत बाजारपेठेत २,४४,५९२ युनिट्सची विक्री झाली.

### एलोरा ब्रुअरीमध्ये नवीन कॅनिंग लाइन

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील सर्वात मोठी बिअर उत्पादक कंपनी आणि हाइनेकेन कंपनीचा भाग असलेल्या युनायटेड ब्रुअरीज लिमिटेड ने आज महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील वाळूज एमआयडीसी परिसरातील आपल्या एलोरा ब्रुअरीमध्ये नवीन कॅनिंग लाइन कार्यान्वित करण्याची योजना जाहीर केली आहे. ₹110 कोटींच्या गुंतवणुकीतून उभारण्यात आलेली ही सुविधा आवश्यक वैधानिक मंजुरी मिळाल्यानंतर सप्टेंबर 2026 मध्ये कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. या गुंतवणुकीमुळे यूबीएलची उत्पादन क्षमता अधिक मजबूत होईल, ब्रुअरीची उत्पादकता वाढेल आणि भारतातील महत्त्वाच्या बिअर बाजारपेठांपैकी एक असलेल्या महाराष्ट्रातील वाढत्या मागणीला प्रतिसाद देण्याची कंपनीची क्षमता वाढेल.

### किसनाचे दिमाखदार आगमन

**पुणे :** किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने पुण्यातील अमेनोरा मॉल, हडपसर येथे महाराष्ट्रातील आपल्या १०व्या एक्सक्लुझिव्ह शोरूमचे उद्घाटन केले. हरी कृष्णा ग्रुपचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक घनश्याम ढोलकिया यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला. पुणे आणि परिसरातील ग्राहकांना दर्जेदार, आधुनिक आणि विश्वासार्ह डायमंड व गोल्ड ज्वेलरीचा अनुभव उपलब्ध करून देणे हा या नव्या शोरूममागील प्रमुख उद्देश आहे.

## कन्नड शहर पोलिसांच्या बीटवर अधिकारी-कर्मचाऱ्यांची नव्याने नियुक्ती

### 23 गावांसह संपूर्ण शहरातील कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यावर भर

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.०२ सप्टेंबर - कन्नड शहर पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील कन्नड शहर, अंधानेर आणि बहिरगाव या तीन बीटमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, महिलांची सुरक्षा अधिक प्रभावी करणे तसेच गुन्हेगारीला आळा घालण्याच्या उद्देशाने उपविभागीय पोलिस अधिकारी आरती पवार यांनी ही नियुक्ती केली आहे.

कन्नड शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत संपूर्ण कन्नड शहरासह २३ गावांचा समावेश आहे. या मोठ्या कार्यक्षेत्रात पोलिसांची गस्त अधिक प्रभावी व्हावी आणि नागरिकांशी पोलिसांचा थेट संपर्क वाढावा, यासाठी बीटनिहाय अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नवीन नियुक्तीनुसार कन्नड शहर बीटमध्ये एका सहाय्यक पोलिस निरीक्षकासह आठ कर्मचारी, अंधानेर बीटमध्ये एका पोलिस उपनिरीक्षकासह चार कर्मचारी, तर बहिरगाव बीटमध्ये दोन पोलिस उपनिरीक्षक आणि दोन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कन्नड शहराची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ४० हजार ७५९ आहे. शहरासह २३ गावांचा समावेश असलेल्या कन्नड शहर पोलिस ठाण्याच्या कार्यक्षेत्राचे क्षेत्रफळ १७ हजार ९१८ हेक्टर आर आहे. एवढ्या मोठ्या क्षेत्रात कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांवर असून, बीटवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी आपल्या कार्यक्षेत्रात नियमित गस्त घालणार असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, संवेदनशील ठिकाणांची पाहणी करणे, महिलांच्या सुरक्षेबाबत आवश्यक उपाययोजना करणे आणि नागरिकांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देण्यावर भर दिला जाणार आहे.

विशेषतः महिला व मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने गर्दीची ठिकाणे, शाळा-महाविद्यालय परिसर तसेच संवेदनशील भागांमध्ये पोलिसांची उपस्थिती वाढविण्यावर भर राहणार आहे. बीटवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून स्थानिक पातळीवरील गुन्हेगारीला आळा घालण्याच्या दृष्टीने काम करणे अपेक्षित आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, महिलांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक निर्माण करणे, हा या नियुक्तीमागील प्रमुख उद्देश आहे.

## निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा राम मंदिर ट्रस्टचे पहिले सीईओ नियुक्त

प्रशासकीय कामकाज अधिक मजबूत आणि सुव्यवस्थित करण्यासाठी, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची आपल्या पहिल्या पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदावर नियुक्ती केली आहे. मंदिर व्यवस्थापनाला बळकटी देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

प्रशासकीय सुधारणा आणि पार्श्वभूमी

नुकत्याच समोर आलेल्या निधी व्यवस्थापनाच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ट्रस्टने आपले प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक आणि मजबूत करण्याचे ठरवले आहे. याच उद्देशासाठी यावर्षी जुलैमध्ये सीईओ पदासाठी अर्ज मागवण्यात आले होते. एका उच्चस्तरीय शोध समितीने तीन पात्र उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट करून ट्रस्टकडे सादर केली होती, ज्यामधून एअर मार्शल मिश्रा यांची अंतिम निवड करण्यात आली.

एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची कारकीर्द

**संरक्षण सेवा:** मिश्रा ६ डिसेंबर १९८६ रोजी लढाऊ वैमानिक (फायटर पायलट) म्हणून भारतीय हवाई दलात रुजू झाले.

**प्रमुख शैक्षणिक पार्श्वभूमी:** ते पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमी (NDA), बंगळूर येथील एअर फोर्स टेस्ट पायलट्स स्कूल, अमेरिकेतील एअर कमांड अँड स्टाफ कॉलेज आणि युकेमधील रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीजचे माजी विद्यार्थी आहेत.

**अनुभव:** फायटर कॉम्बॅट लीडर असलेल्या मिश्रा यांना ३,००० तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव आहे. त्यांनी आपल्या ३८ वर्षांच्या दिर्घ कारकिर्दीत फायटर स्क्वाड्रनचे नेतृत्व करणे, चीफ टेस्ट पायलट म्हणून काम पाहणे तसेच पश्चिम हवाई कमांडचे प्रमुखपद अशा अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

## केदारनाथ हेलिकॉप्टर सेवेसाठी सात सप्टेंबरपासून बुकिंग विंडो उघडणार

**डेहराडून :** चारधाम यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यात केदारनाथ धामला जाणाऱ्या भाविकांसाठी हेलिकॉप्टर सेवा १५ सप्टेंबरपासून पुन्हा सुरू होणार आहे. उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाने (यूसीएडीए) यासाठी तयारी वेगाने सुरू केली असून, पहिली तिकीट बुकिंग विंडो ७ सप्टेंबरपासून उघडण्याची तयारी आहे.

यूसीएडीएच्या माहितीनुसार, तिकिटांचा काळाबाजार रोखण्यासाठी आणि बुकिंग व्यवस्था सुव्यवस्थित करण्यासाठी दुसऱ्या टप्प्यात १५-१५ दिवसांच्या कालावधीसाठी टप्प्याटप्प्याने तिकिटे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. प्राधिकरणाने हेलिकॉप्टर ऑपरेटरसोबत आवश्यक बैठका घेतल्या आहेत. तसेच नागरी उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) आणि हवामान विभागासोबतही समन्वय साधला जात आहे.

यूसीएडीएने सांगितले की, हेलिकॉप्टर सेवेचे संचालन हवामानाची परिस्थिती, सुरक्षा मानके आणि डीजीसीएच्या परवानगीच्या अनुषंगानेच केले जाईल. प्राधिकरणाने भाविकांना केवळ अधिकृत माध्यमातूनच तिकीट बुक करण्याचे आवाहन केले आहे. केदारनाथ शटल सेवेसाठी heliyatra.irctc.co.in आणि बद्रीनाथ शटल सेवेसाठी helitaxii.com चा वापर करण्यास तसेच अनधिकृत एजंट आणि मध्यस्थांकडून तिकीट खरेदी न करण्यास सांगितले आहे.

## एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी स्मार्ट कार्ड केंद्रातील ऑपरेटरला 204 रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि. ०२ :** एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी निर्धारित शुल्कापेक्षा जादा रक्कम मागून लाच स्वीकारणाऱ्या गंगापूर येथील एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण केंद्रातील ऑपरेटरवर छत्रपती संभाजीनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मंगळवारी (१ सप्टेंबर) कारवाई केली. भारत यशवंत राऊत(वय ३५), ऑपरेटर, एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण केंद्र, एम.टी. बसस्थानक, गंगापूर याला पंचांसमक्ष लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

एसीबीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, तक्रारदार आपल्या पत्नी, मुलगी व बहिणींसाठी एस.टी. महामंडळाच्या प्रवासाकरिता एनसीएमसी स्मार्ट कार्ड काढण्यासाठी गंगापूर येथील केंद्रात गेले होते. शासनाच्या नियमानुसार एका कार्डासाठी १९९ रुपये शुल्क असताना आरोपी ऑपरेटरने प्रतिकार्ड २५० रुपये, म्हणजे चार कार्डांसाठी एकूण १ हजार रुपये मागितले. यामध्ये निर्धारित शुल्कापेक्षा २०४ रुपये जादा रक्कम लाच म्हणून मागण्यात आल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली.

तक्रारीची पडताळणी २७ ऑगस्ट रोजी करण्यात आली. त्यावेळी आरोपीने चार एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी प्रतिकार्ड २५० रुपये याप्रमाणे एक हजार रुपये मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मंगळवारी एसीबीच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली. आरोपीने तक्रारदाराकडून प्रतिकार्ड २५० रुपये याप्रमाणे दोन कार्डांसाठी ५०० रुपये पंचांसमक्ष स्वीकारले, त्यानंतर त्याला रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील कलम ७(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. कारवाई पोलीस अधीक्षक प्रतिभा औंधकर यांच्या मार्गदर्शनाखाली, तपास अधिकारी पोलीस निरीक्षक अमोल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. सापळा पथकात पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

## शिर्डीत माळी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा संपन्न

**शिर्डी (प्रतिनिधी) :** माळी समाज विकास संस्था वधू-वर सूचक केन्द्र पुणे आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, अहिल्यानगर यांच्या वतीने माळी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा निसर्ग रिसॉर्ट शिर्डी संपन्न झाला .



माजी नगराध्यक्ष डॉ .के. वाय. गाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रमुख पाहुणे गोरक्षनाथ गाडीलकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला .

या वधू वर परिचय मेळाव्यासाठी ९३ मुले व ३७ मुलींनी सहभाग नोंदवला. अहिल्यानगर, जळगाव, धुळे, मालेगाव, संभाजीनगर, बीड, अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगाव, नाशिक, ठाणे येथून वधू वर आले होते. आलेल्या वधू-वर उमेदवारांनी आपला परिचय करून देत, आपल्या आयुष्याचा जोडीदार कसा असावा यावर आपले मत सांगितले. यावेळी आधार फाउंडेशन यांच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल महात्मा फुले समता परिषदेचे राहाता तालुका सरचिटणीस संजय इनामके यांचा सत्कार शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर यांच्या हस्ते करण्यात आला.

या वधू वर मेळाव्यासाठी अशोकराव गाडेकर, सुभाषराव गायकवाड, समता परिषदेचे राहाता तालुका अध्यक्ष किशोरराव बोरावके, उत्तर जिल्हा अध्यक्ष प्रशांत शिंदे ,भामरे नाना, प्रभाकर बोरावके, कर्मवीर काळे कारखान्याचे व्हा. चेअरमन दिनार कुदळे ज्योती क्रांती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदिनाथ हजारे, मच्छिंद्र गुलदगड, नानासाहेब गाडेकर, शंकरशेठ नेवसे, बाळासाहेब ताजणे, भगवान गाडेकर, विलासराव टिळेकर , राजेंद्र इनामके ,सदानंद ताम्हाणे, प्रभाकर गाडेकर, हनुमंत जगताप, संजय गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मेळावा यशस्वी करण्यासाठी सुधाकर गिलचे, सुनंदाताई गिरमे, हेमाताई पुंड, संजय झगडे, सुरेश दरवडे, नितीन ताठे, अरुणाताई गिलचे, रोहीत टिळेकर, गोरक्षनाथ जगताप, प्रकाश शिंदे आदिनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्तविक संस्थेचे अध्यक्ष हनुमंत टिळेकर , सूत्रसंचालन सचिव पांडुरंग गाडेकर आणि आभारप्रदर्शन संजय इनामके यांनी केले.

## भुईकोट किल्ल्याच्या विकासाचा मार्ग मोकळा; जिल्हा प्रशासन व लष्कर प्रशासनात सामंजस्य करार

**अहिल्यानगर :** ऐतिहासिक वारसा लाभलेल्या भुईकोट किल्ल्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासन, अहिल्यानगर आणि लष्कर प्रशासन यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नांतून हा करार झाला. त्यामुळे किल्ल्याच्या विकासकामांना आता गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

स्टेशन हेडक्वार्टर, अहिल्यानगर येथे स्टेशन कमांडर ब्रिगेडियर सुनील कुमार आणि जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील उपस्थित होते.

भुईकोट किल्ला हा अहिल्यानगरच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वैभवाचा महत्त्वपूर्ण ठेवा आहे. किल्ल्याचे संवर्धन, परिसराचा नियोजनबद्ध विकास, पायाभूत सुविधा आणि पर्यटनाच्या दृष्टीने उपलब्ध शक्यतांचा विकास करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. या करारामुळे जिल्हा प्रशासन व लष्कर प्रशासनातील समन्वय अधिक प्रभावी होऊन विकासकामांना चालना मिळणार आहे. भुईकोट किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा जपत त्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास झाल्यास जिल्ह्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. पर्यटकांची संख्या वाढल्याने स्थानिक व्यवसाय, रोजगार आणि पर्यटनाशी संबंधित विविध उपक्रमांना संधी मिळणार आहे. ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन करून हा वारसा भावी पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीनेही हा करार महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## वाळू-मुरूम माफियांची मुजोरी; पोलिसांच्या अंगावरच घातले वाहन!

तभा वृत्तसेवा

**कन्नड :-** दि.०१ सप्टेंबर - तालुक्यात सुरू असलेल्या अवैध वाळू-मुरूम वाहतुकीवर प्रशासनाचा वचक नेमका कुठे आहे, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. अवैध गौणखनिज वाहतूक रोखण्यासाठी गेलेल्या पोलिसांच्या अंगावरच वाहन घालण्याचा प्रयत्न दि.०१ रोजी झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. त्यामुळे अवैध वाळू-मुरूम वाहतूक करणाऱ्यांना नेमके कोणाचे पाठबळ आहे? महसूल प्रशासनाचे पथक करते तरी काय? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

०१ सप्टेंबर रोजी सकाळी ७.१४ वाजता हिवरखेडा रोड परिसरात अवैध वाळू वाहतुकीबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिस पथकाने कारवाईसाठी धाव घेतली. यावेळी संशयित वाहनाचा पाठलाग करताना पोलिसांच्या कारवाईला हुलकावणी देण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर संबंधित वाहनचालकाने पोलिसांच्या अंगावरच वाहन घालण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेमुळे पोलिसांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. अवैध वाहतूक रोखण्यासाठी गेलेल्या पथकावरच वाहन घालण्याची हिंमत होत असेल, तर अशा वाहतूकदारांना प्रशासनाचा धाक उरला आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

एकीकडे तलाठ्याचा जीव धोक्यात, दुसरीकडे पोलिसांवर वाहन

या घटनेमुळे कन्नड तालुक्यातील अवैध वाळू-मुरूम वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. देवगाव-रंगारी परिसरात अवैध गौणखनिज वाहतुकीवर कारवाई करताना एकटा तलाठी जीव धोक्यात घालून काम करत असल्याची परिस्थिती असल्याचे समोर येत आहे. कारवाईदरम्यान आवश्यक पोलिस मदत मिळत नसल्यास महसूल कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी कोणाची, हा प्रश्नही



उपस्थित होत आहे.

एकीकडे महसूल विभागातील कर्मचारी अवैध वाळू-मुरूम वाहतूक रोखण्यासाठी मैदानात उतरताना दिसतात; मात्र त्यांना पुरेसे मनुष्यबळ आणि पोलिसांची मदत मिळते का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. दुसरीकडे पोलिस कारवाईसाठी गेलेल्या पथकाच्या अंगावरच वाहने घालण्यापर्यंत संबंधितांची मजल जात असेल, तर कन्नड तालुक्यात नेमके चालले तरी काय? असा सवाल आता नागरिकांकडून विचारला जात आहे.

महसूल प्रशासनाचे पथक नेमके करते काय?

> "या दोन्ही घटना गंभीर असून, संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्यात येईल. तालुक्यात कार्यरत असलेल्या पथकांचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. अवैध गौणखनिज वाहतुकीवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी यापुढे अधिक कडक कारवाई केली जाईल. अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल."
>
> **- संतोष गोरड, उपविभागीय अधिकारी**

तालुक्यातील विविध भागांत वाळू, मुरूम आणि इतर गौणखनिजांची वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी असताना महसूल विभागाकडून किती पथके कार्यरत आहेत? दररोज किती वाहनांची तपासणी केली जाते? किती वाहनांवर दंडात्मक कारवाई झाली? किती वाहने जप्त करण्यात आली? अवैध उत्खननाच्या ठिकाणी प्रत्यक्ष पंचनामे किती झाले? याचा हिशेब महसूल प्रशासनाने जनतेसमोर मांडण्याची गरज आहे.

पोलिस उपनिरीक्षक केसरसिंग जारवाल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पोलिस पथक अवैध वाळू वाहतुकीवर कारवाईसाठी गेले असता संबंधित वाहनचालकाने पोलिसांच्या मोटारसायकलला बाजूने धडक देण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला असता वाहनचालकाने पोलिस कर्मचाऱ्याच्या अंगावर वाहन घालण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी दि.०२ रोजी कन्नड शहर पोलिस ठाण्यात संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांवर वाहन घालण्याचा प्रयत्न होतो, तलाठ्यांना कारवाई करताना जीव मुठीत धरावा लागतो आणि तरीही अवैध गौणखनिज वाहतूक सुरूच राहत असेल, तर प्रशासनाचा नेमका धाक कुणावर आहे? हा प्रश्न आता वरिष्ठ महसूल आणि पोलिस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# उस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन 5,200 रुपये दर द्यावा; भारतीय किसान संघाच्या महाराष्ट्र प्रांत बैठकीत ठराव; अध्यक्ष बळिराम सोळंके यांची मागणी

**अंबाजोगाई :** उसाच्या उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असल्याने उस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५,२०० रुपये उसदर देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी भारतीय किसान संघाच्या महाराष्ट्र प्रांताच्या व्यापक बैठकीत करण्यात आली. या संदर्भातील ठराव प्रांताध्यक्ष बळीरामजी सोळंके गुरुजी यांनी बैठकीत मांडला असून तो मंजूर करण्यात आला.

भारतीय किसान संघाची महाराष्ट्र प्रांताची व्यापक बैठक तुळजापूर येथे दि. २९ व ३० ऑगस्ट रोजी पार पडली. या बैठकीत राज्यातील शेतीसमोरील विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करून शेतकरीहिताचे अनेक महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. बैठकीस राज्यातील २३ जिल्ह्यांतील सुमारे ३६० प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी राज्यातील खरीप हंगाम, पर्जन्यमान आणि एकूण शेतीस्थितीचा आढावा घेण्यात आला. राज्यातील अनेक भागांत झालेल्या असमान पावसामुळे निर्माण झालेल्या टंचाईसदृश परिस्थितीची गंभीर दखल घेण्यात आली. ही परिस्थिती दुष्काळात रूपांतरित होण्यापूर्वी शासनाने तातडीने विशेष उपाययोजना जाहीर कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक संघटितपणे आणि प्रभावीपणे मांडण्यासाठी भारतीय किसान संघाने संघटन विस्तारावर विशेष भर देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील २५ जिल्ह्यांतील २७८ तालुक्यांमध्ये ३ लाख सभासदांची नोंदणी करण्याबरोबरच ३ हजार ग्राम समित्या स्थापन करण्याचा संकल्प बैठकीत करण्यात आला.

सभासद नोंदणी पूर्ण झाल्यानंतर ग्राम, तालुका, जिल्हा आणि प्रांत स्तरावर संघटनात्मक निवडणुका घेण्यात येणार असून, त्यानंतर प्रांतस्तरीय अधिवेशन आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



बैठकीतील प्रमुख ठराव

उस उत्पादनाचा वाढता खर्च लक्षात घेऊन उस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५,२०० रुपये उसदर देण्यात यावा.

राज्यातील टंचाईसदृश परिस्थितीचे दुष्काळात रूपांतर होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने विशेष उपाययोजना जाहीर कराव्यात.

पेट्रोलमध्ये २५ टक्के इथेनॉल मिश्रण तसेच डिझेलमध्ये ५ टक्के आयसोब्युटेनॉल मिश्रण करण्याच्या प्रस्तावाचा केंद्र शासनाने गांभीर्याने विचार करावा.

वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी आवश्यक कायदेशीर अधिकार शेतकऱ्यांना मिळावेत.

गोसेवा आयोग व राज्य शासनाने पुरेशा आर्थिक तरतुदीसह व्यापक देशी गोवंश संवर्धन धोरण राबवावे.

अफगाणिस्तानमार्गे होणाऱ्या अवैध चिनी बेदाण्याच्या आयातीवर बंदी घालून देशातील, विशेषतः महाराष्ट्रातील द्राक्ष व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांना संरक्षण द्यावे.

शेती करणाऱ्या तरुणांच्या विवाहाचा प्रश्न सामाजिक दृष्टिकोनातून हाताळण्याची आवश्यकता असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. किसान संघाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या मुलींचे विवाह शेतकरी तरुणांशी करून सामाजिक परिवर्तनात पुढाकार घ्यावा, असा ठरावही मंजूर करण्यात आला.

मराठवाड्यातील फळपिकांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र विशेष प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात यावी.

तसेच मराठवाड्यातील सर्व धरणे परस्परांना जोडून शाश्वत सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती देण्यात यावी, असा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला.

शेतकरीहिताच्या या सर्व मागण्यांची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने अंमलबजावणी करावी. अन्यथा लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून आंदोलन व संघर्ष करण्याचा इशारा भारतीय किसान संघाने दिला आहे.

संघटन विस्ताराच्या माध्यमातून गावपातळीवर अधिकाधिक शेतकऱ्यांना जोडून त्यांच्या प्रश्नांसाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धारही या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस भारतीय किसान संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष के. साई रेड्डी, राष्ट्रीय मंत्री बाबूभाई पटेल, महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बळिराम सोळंके, क्षेत्रीय संघटन मंत्री पद्मश्री डॉ. दादा लाड, प्रांत महामंत्री मदन देशपांडे, मराठवाडा विभागाचे मदनआबा नरवाडे, बैठकीचे संयोजक नितीन घुले यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व राज्यभरातील प्रतिनिधी उपस्थित होते..

## अवैध जुगार व दारुविक्रीविरोधात पोलिसांची धडक कारवाई: 24 जणांवर गुन्हे दाखल, 7.66 लाखांचा मुद्देमाल जप्त



**बीड :** जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे विशेष पथकाने विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत धडक कारवाई केली आहे. या धडक कारवाईत जुगाराच्या दोन वेगवेगळ्या प्रकरणात २३ जणांवर तर अवैध दारूविक्रीच्या एका प्रकरणात एका व्यक्तीवर अशा एकूण २४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या संपूर्ण कारवाईदरम्यान रोख रक्कम, मोबाईल फोन, वाहने आणि अवैध दारू असा एकूण ७ लाख ६६ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिरालाल चौक येथील मारुती मंदिराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पथकाने छापा टाकला. या कारवाईदरम्यान १४ जण जुगार खेळताना रंगेहाथ आढळले. त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा एकूण ३ लाख ४२ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डोंगरकिन्ही येथील एका हॉटेलमध्ये जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला. तेथे ९ जण जुगार खेळताना आढळून आले. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल फोन आणि वाहने असा एकूण ४ लाख १० हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. याशिवाय अमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डोंगरकिन्ही परिसरात अवैध दारूविक्रीवरही कारवाई करण्यात आली. देशी व विदेशी दारूची अवैध विक्री करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याच्याकडून अवैध दारू आणि मोबाईल फोन असा एकूण १३ हजार ९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटरमण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजित खुळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने केली. या कारवाईत संबंधित पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते.

## नाट्यगृह नूतनीकरणाचे काम तात्काळ सुरु करा- अनिलदादा जगताप

**बीड, प्रतिनिधी :** बीडमधील कलाकारांच्या हक्काचे आणि शहराच्या सांस्कृतिक वैभवाचे केंद्र असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची झालेली दुरवस्था, नशाधुंद टोळक्यांकडून करण्यात आलेली तोडफोड, परिसरात सुरू असलेले मद्यपान तसेच साऊंड सिस्टम चोरीला जाण्याच्या घटनांवरून शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड नगर पालिका प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. कलाकारांच्या हक्काच्या नाट्यमंदिराची अशी अवस्था आम्ही अजिबात सहन करणार नाही. नाट्यगृह सुरक्षित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सुरक्षा व्यवस्थेत कोणतीही



हलगर्जीपणा अथवा दिरंगाई चालणार नाही, अशा कडक शब्दांत अनिलदादा जगताप यांनी बीड नगर पालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांना सूचना दिल्या.

नाट्यगृहात वारंवार घडणाऱ्या अनुचित प्रकारांच्या पार्श्वभूमीवर अनिलदादा जगताप यांनी काल दि. 1 सप्टेंबर 2026 रोजी दु. 2.00 वाजताच्या मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांना प्रत्यक्ष नाट्यगृहात बोलावून परिस्थितीची पाहणी केली आणि माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नाट्यगृहाच्या सुरक्षेबाबत प्रशासनाची जबाबदारी निश्चित करत तात्काळ दोन सुरक्षा रक्षक नियुक्त करा, बंद असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करा आणि नाट्यगृहाच्या परिसरात कोणत्याही प्रकारे गैरप्रकार होणार नाहीत याची व्यवस्था करा, असे स्पष्ट निर्देश दिले. तसेच नाट्यगृहाच्या आवारात कचरा घंटागाड्या लावण्याच्या प्रकारावरही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. नाट्यगृह हा कचरा साठवण्याचा परिसर नाही. हा कलाकारांचा आणि रसिकां

## प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेअंतर्गत संलग्न योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा : सुप्रीत सिंग गुलाटी

**बीड, दि. 2 (जिमाका) :-** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांना स्वावलंबी बनवण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'ची (PMDDKY) बीड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करावी. यासाठी सर्व संबंधित विभागांनी योग्य समन्वय साधून सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश या योजनेचे केंद्रीय नोडल अधिकारी (CNO) सुप्रीत सिंग गुलाटी (भाप्रसे) यांनी आज येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात योजनेच्या अंमलबजावणीबाबत विशेष आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. भारत सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाचे संयुक्त सचिव तथा प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेचे केंद्रीय नोडल अधिकारी सुप्रीत सिंग गुलाटी (भाप्रसे) यांच्या अध्यक्षतेखाली हा आढावा घेण्यात आला.

या बैठकीत जिल्हा परिषद, ग्रामीण विकास यंत्रणा (DRDA), कृषी विभाग, आत्मा, भूमी अभिलेख, सहकार, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (CADA), जलसंधारण, पाटबंधारे (BID), मत्स्य विभाग, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, अन्न व औषध प्रशासन, आदिवासी व सामाजिक न्याय विभाग, खादी आणि ग्रामोद्योग, कृषी विज्ञान केंद्रे, बँका (जिल्हा अग्रणी बँक, नाबार्ड, जिल्हा मध्यवर्ती बँक), उद्योग केंद्र, कौशल्य विकास, पणन (मार्केटिंग) आणि रेशीम विकास आदी विभागांच्या कामकाजाचा व त्यांच्याकडील PMDDKY अंतर्गत संलग्न योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय व तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. देशभरातील १०० आणि महाराष्ट्रातील ९ जिल्ह्यांची या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी निवड करण्यात आली आहे. बैठकीमध्ये सुप्रीत सिंग गुलाटी यांनी योजनेच्या ६ प्रमुख उद्दिष्टांच्या अनुषंगाने जिल्ह्याच्या सद्यस्थितीची माहिती घेतली. यामध्ये कृषी उत्पादकता वाढवणे, पीक विविधीकरणास चालना देणे, शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब, पंचायत स्तरावर काढणीपश्चात धान्य साठवणूक क्षमता वाढवणे, सिंचन सुविधांमध्ये सुधारणा आणि शेतकऱ्यांना सुलभ कर्ज उपलब्धता यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या योजनेअंतर्गत केंद्र आणि राज्य शासनाच्या ३६ विविध योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामपंचायती, कृषी विज्ञान केंद्रे, कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि सहकारी संस्थांच्या माध्यमातून या योजनांचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. यासाठी पायाभूत सुविधांच्या उभारणीतील प्रशासकीय अडचणी तातडीने दूर कराव्यात आणि प्रलंबित कामे गतीने पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना गुलाटी यांनी दिल्या.

## कास्ट्राईबच्या संघटनात्मक विस्ताराला बळ; इबिते,टाकणखार व हौसरमल यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी



**माजलगाव :** महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ,लातूर विभागाच्या कार्यकारिणीची बैठक विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली ३१ ऑगस्ट रोजी अंबाजोगाईच्या शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली. या बैठकीत संघटनेच्या विविध पदांवर नवीन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. माजलगाव तालुक्यातून बीड जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रा. अभिमन्यु इबिते,लातूर विभागीय कार्यकारिणीच्या सहसचिवपदी भारत टाकणखार,तर बीड जिल्हा शिक्षण विभागाच्या उपाध्यक्षपदी कृष्णा हौसरमल यांची एकमताने निवड करण्यात आली.संघटनात्मक कार्याचा अनुभव,कर्मचारी हितासाठी सातत्याने केलेले कार्य तसेच संघटनेच्या बळकटीकरणासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांच्यावर या महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.या बैठकीस कास्ट्राईबचे विभागीय सचिव महादेव गायकवाड,उपाध्यक्ष संतोष बोबडे,बप्पा कदम,जनरल जिल्हाध्यक्ष सुमेध जोगदंड,प्राथमिक शिक्षण विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल पोटभरे,माजलगाव तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार यांच्यासह धोंडीराम रामुळे,प्रविण जाधव,राहुल खुणे,हनुमंत पांढरपोटे,नितीन पुटवाड तसेच लातूर विभागीय कार्यकारिणी व बीड जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवनिर्वाचित पदाधिकारी अभिमन्यु इबिते,भारत टाकणखार व कृष्णा हौसरमल यांचे माजलगाव कास्ट्राईबच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.त्यांच्या अनुभवाचा व कार्यक्षमतेचा संघटनेच्या आगामी वाटचालीस निश्चितच लाभ होईल,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.तसेच कर्मचारी हित,सामाजिक न्याय आणि संघटनात्मक बळकटीकरणासाठी त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

## श्री गुरुपादुका मठातर्फे बनसारोळा येथे गोकुळ अष्टमी रोजी बगलामुखी,रुद्र,भैरव, चंडी महायागाचे आयोजन

**अंबाजोगाई :** पावन श्रावण मासानिमित्त अंबाजोगाई येथील श्री गुरुपादुका मठाच्या वतीने बगलामुखी,रुद्र, भैरव ,चंडी महाशक्ती महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ०४ सप्टेंबर २०२६ शुक्रवार गोकुळ अष्टमी रोजी सकाळी ८ वाजता बनसारोळा येथील आदर्श विद्यालयाच्या शेजारील प्रांगणात या पवित्र हवन युक्त सेवेला प्रारंभ होणार आहे. या यागामध्ये माता बगलामुखी, रूद्र, भैरव व चंडी यज्ञाचे एकत्रितपणे आयोजन करण्यात आले आहे. अध्यात्मिक प्रगतीसाठी,कौटुंबिक शांती , व्यवसायिक प्रगती त्याचबरोबर जीवनातील अडथळे दूर होण्यासाठी या यज्ञाचा फायदा होणार असल्याचे श्री गुरुपादुका मठा कडून सांगण्यात आले आहे.

देशभरात आजपर्यंत अनेक लहान मोठे यज्ञ संपन्न झाले परंतु महाराष्ट्राच्या इतिहासात बगलामुखी, रुद्र, भैरव, चंडी अशा चारही स्त्रोतांचा एकत्र असा महापवित्र यज्ञ प्रथमच केला जात आहे. त्यामुळे या यज्ञाला अनन्य साधारण महत्व आहे.या पवित्र सेवेसाठी गुरूवर्य सर्वज्ञेश्वर स्वामी महाराज यांच्यासह प्रवीण बासटवार, श्रद्धा घोडके, संगिता सौदागर, वंदना तट, राजपाल काकडे तसेच शिष्य परिवार पंचक्रोशीतील सर्व स्वामीभक्त आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

## अंबाजोगाईच्या रमाबाई झळकल्या राष्ट्रीय माध्यमांत: कौतुकाच्या पलीकडे जाऊया, आता हवी मदतीची साथ..!

**अंबाजोगाई :** पायात स्पोर्ट्स शूज नाहीत, अंगावर ट्रॅकसूट नाही... धावण्याचे कोणतेही विशेष प्रशिक्षण नाही. मात्र डोळ्यांसमोर दोन मुलींच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न आणि परिस्थितीशी दोन हात करण्याची जिद्द ! याच जिद्दीच्या जोरावर रमाबाई राणवीर यांनी अंबाजोगाईतील ‘अमृत दौड’ मध्ये अनवाणी धावत प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या अनोख्या विजयाची चर्चा आता केवळ अंबाजोगाईपुरती राहिलेली नसून राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रे, न्यूज चॅनल्स, पोर्टल आणि समाजमाध्यमांपर्यंत पोहोचली आहे.

रमाबाईंचा अनवाणी धावत असल्याचा व्हिडिओ आणि छायाचित्रे समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. अनेकांनी त्यांचा संघर्ष पाहून कौतुक केले, पोस्ट शेअर केल्या आणि त्यांच्या जिद्दीला सलाम केला. मात्र, फक्त कौतुक करून रमाबाईंच्या आयुष्यातील परिस्थिती बदलणार आहे का ? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

रमाबाईंची ही धाव केवळ एका स्पर्धेतील विजयाची कहाणी नाही. मुलींच्या शिक्षणासाठी परिस्थितीशी झुंज देणाऱ्या एका आईची ही आयुष्यभराची धाव आहे. पतीच्या निधनानंतर दोन मुलींची जबाबदारी रमाबाईंच्या खांद्यावर आली. परिस्थितीपुढे हार न मानता त्यांनी हिंगोली सोडून अंबाजोगाई गाठली. येथे स्वयंपाकाची कामे करून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्या आपल्या मुलींच्या शिक्षणाचा खर्च भागवत आहेत. स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून मुलींनी शिकावे, मोठे व्हावे आणि स्वतःच्या पायावर उभे राहावे, हेच त्यांचे स्वप्न आहे. आज एक मुलगी ‘बीएससी’ चे शिक्षण घेत आहे, तर दुसरी पोलिस भरतीची तयारी करत आहे. मुलींच्या भविष्यासाठी रमाबाई आजही कष्टाची शर्यत धावत आहेत.

अनवाणी पावलांमागची कहाणी वेदनादायी...



‘अमृत दौड’ च्या दिवशी पावसामुळे रस्ता चिखलमय झाला होता. अनेक स्पर्धक स्पोर्ट्स शूज आणि आधुनिक साहित्य घेऊन मैदानात उतरले होते. रमाबाईंनी मात्र साडीचा पदर सावरला, चपला हातात घेतल्या आणि अनवाणीच धावायला सुरुवात केली. एक – एक करत प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत त्यांनी फिनिशिंग लाईन गाठली आणि सुवर्णपदकासह 3 हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले. त्यांच्या पावलांना शूज नव्हते ; पण त्या पावलांमध्ये मुलींच्या भविष्याची स्वप्ने होती. हातात चपला होत्या ; पण मनात मुलींच्या शिक्षणाची मशाल होती.

कौतुकापेक्षा मदतीची गरज

आज रमाबाईंच्या जिद्दीचे कौतुक करणाऱ्या असंख्य पोस्ट समाजमाध्यमांवर दिसत आहेत. मात्र, या पोस्टसोबत एखाद्या दानशूर व्यक्तीने त्यांच्या मुलींच्या शिक्षणासाठी हात पुढे केला, तर तेच रमाबाईंच्या संघर्षाला खरे बळ ठरेल. अंबाजोगाईतील दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था आणि शिक्षणप्रेमींनी पुढाकार घेऊन रमाबाईंच्या मुलींच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. राष्ट्रीय स्तरावर झळकलेल्या रमाबाईंच्या जिद्दीचे कौतुक तर झाले; आता त्यांच्या संघर्षाला साथ देण्याची वेळ आली आहे. फक्त कौतुक नको... त्यांच्या मुलींच्या स्वप्नांना आधार देण्यासाठी पुढे येण्याची गरज आहे.

## कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद ; महासंघाच्या बैठकीत 25 हून अधिक पदाधिकाऱ्यांच्या निवडी

**अंबाजोगाई :** महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या आवाहनाला बीड जिल्ह्यात भरभरून प्रतिसाद मिळाला. सर्व शाखांची मुदत संपणार असल्याने बैठक घेऊन सर्वानुमते २५ हून अधिक पदाधिकाऱ्यांच्या नव्याने निवडी करण्यात आल्या आहेत अशी माहिती महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या नुतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी संदर्भात शहरातील 'अंबारी' शासकीय विश्रामगृह, अंबाजोगाई येथे सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महासंघाचे विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे हे होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला कास्ट्राईबचे दिवंगत नेते एस.टी.गायकवाड यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सदरील बैठकीत सर्वप्रथम सभेचे अध्यक्ष व प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले. सुरूवातीला प्रास्ताविक करताना राहुल पोटभरे (जिल्हासचिव) यांनी सांगितले की, सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. मरगळ झटकून नव्या जोमाने कामाला सुरूवात करावी, संघटनेत प्रामाणिकपणे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. बैठकीच्या प्रारंभी महासंघाच्या बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा आणि तालुका कार्यकारिणी बरखास्त करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. व त्यानंतरच विविध पदांसाठी नुतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तत्पूर्वी जिल्हा स्तरावर आणि अंबाजोगाई तालुका स्तरावर महासंघाचे काम करण्यासाठी उपस्थित सदस्य यांची सहमती घेण्यात आली. त्यानुसार महासंघाचे विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे यांनी पुढीलप्रमाणे निवडी जाहीर केल्या त्यात महादेव गायकवाड (विभागीय महासचिव), भारत टाकणखार (विभागीय सहसचिव), सुमेध जोगदंड (जिल्हाध्यक्ष - जनरल), राहूल पोटभरे (जिल्हाध्यक्ष - शिक्षण



विभाग) यांच्यासह मोहन कांबळे (मुख्य संघटक - जनरल), बप्पाजी कदम (जिल्हा उपाध्यक्ष - जनरल), संजय पाडोळे (सहसचिव - जनरल), सुनंदा वाघमारे (उपाध्यक्ष, जिल्हा महिला आघाडी - जनरल), रघुनाथ सरवदे (कोषाध्यक्ष - जनरल), धनंजय वाघमारे (जिल्हासचिव - जनरल), विनायक चव्हाण (उपाध्यक्ष - शिक्षण विभाग), बाळासाहेब डोंगरदिवे (सचिव - शिक्षण विभाग), शेख युनुस (कोषाध्यक्ष - शिक्षण विभाग), गौतम जोगदंड (सहकोषाध्यक्ष - शिक्षण विभाग), मंगल भुंबे (जिल्हा महीला आघाडी प्रमुख - शिक्षण विभाग), वैजनाथ पथकराव (सहसचिव - शिक्षण विभाग), मनोज वाघमारे (जिल्हाध्यक्ष - आरोग्य विभाग), अभिमन्यू इबिते (जिल्हाध्यक्ष - माध्यमिक शिक्षण विभाग), बाबासाहेब गायकवाड (तालुकाध्यक्ष - अंबाजोगाई), रूपेंद्र बडोले (तालुका सचिव - अंबाजोगाई), सर्जेराव धिमधिमे (तालुका कार्याध्यक्ष - अंबाजोगाई), राजेभाऊ मस्के (कोषाध्यक्ष - अंबाजोगाई), कृष्णा हौसरमल (जिल्हा उपाध्यक्ष - शिक्षण विभाग), राम बनसोडे (समाज कल्याण - वि.प्र.), प्रमिला सिरसट (महिला उपाध्यक्ष - अंबाजोगाई तालुका) या २५ हून अधिक पदाधिकाऱ्यांना नव्याने नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यानंतर दिपक गायकवाड यांनी पदग्रहण करणाऱ्या सर्व नुतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. तर माजलगाव तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार यांनी आपल्या मनोगतात संघटनेत काम करीत असताना पदे जरूर घ्यावीत. परंतु, त्या पदाला न्याय द्यावा,

प्रत्येक तालुक्यात शाखा निर्माण करण्यात यावी, संघटना संचलनासाठी निधी तयार करण्यात यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना म.रा.कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे यांनी सांगितले की, कास्ट्राईबने सदैव सामाजिक सलोखा राखण्यात यश मिळवले आहे. कास्ट्राईबने विविध प्रश्नांवर लढा उभारला. संघटनेशी एकनिष्ठ रहा, संघटनेच्या विविध लोकोपयोगी कार्याची उदाहरणे देऊन सोनवणे यांनी उपस्थित पदाधिकारी व सदस्य यांचा उत्साह वाढवला. बैठकीचे सुत्रसंचालन डॉ.संतोष बोबडे यांनी केले. तर बैठकीसाठी उपस्थित सर्वांचे आभार भारत टाकणखार यांनी मानले. बैठकीस महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांसह सदस्य उपस्थित होते.

# पोषणाचा संदेश घराघरात; 'सुदृढ बालक–निरोगी माता–सक्षम कुटुंब'चा निर्धार

## 1 ते 30 सप्टेंबरदरम्यान जिल्हाभर विविध जनजागृती, आरोग्य तपासणी व मार्गदर्शनपर उपक्रम

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय पोषण माहानिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १ ते ३० सप्टेंबरदरम्यान विविध पोषणविषयक जनजागृती, आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शनपर उपक्रम राबविण्यात येणार आहेत. 'सुदृढ बालक–निरोगी माता–सक्षम कुटुंब' हा संदेश घराघरात पोहोचविण्यासह कुपोषण प्रतिबंध आणि व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात येणार आहे. 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर तसेच महिला व बालविकास विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगल पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय पोषण माहाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. आरोग्य विभाग, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि महिला-बालविकास विभागाच्या समन्वयातून गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत विविध उपक्रम आयोजित केले जाणार आहेत.

अभियानादरम्यान बालकांचे वजन व उंची मोजणे, वाढीचे नियमित निरीक्षण करणे, कमी वजन अथवा कुपोषणाची लक्षणे असलेल्या बालकांची वेळेत ओळख करून त्यांना आवश्यक उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पालकांना वयानुसार पूरक आहार, संतुलित आहार, स्वच्छता, सुरक्षित पाणी आणि हात धुण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

गर्भवती महिलांची नियमित आरोग्य तपासणी, संतुलित आहार, आवश्यक औषधे व पूरक घटकांचे सेवन, विश्रांती आणि स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. स्तनदा मातांना स्तनपानाचे महत्त्व आणि नवजात बालकाच्या योग्य संगोपनाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

महागड्या अन्नपदार्थांपेक्षा स्थानिक व हंगामी स्वरूपात उपलब्ध धान्ये, कडधान्ये, डाळी, पालेभाज्या, भाज्या, फळे, दूध, अंडी आदी पौष्टिक पदार्थांचा योग्य वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महिला बचत गट, ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी केंद्रे आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून पोषणविषयक उपक्रमांना लोकसहभाग मिळवून देण्यात येणार आहे.

पोषणासोबतच सुरक्षित पाणी, वैयक्तिक स्वच्छता, अन्नाची स्वच्छता, परिसर स्वच्छ ठेवणे, नियमित शारीरिक हालचाल, पुरेशी झोप आणि आरोग्यदायी जीवनशैली याबाबतही जनजागृती केली जाणार आहे. आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या गृहभेटींमधून माता-बालकांचे आरोग्य, आहाराच्या सवयी आणि कुपोषणाचा धोका याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

"आजच्या बालकांचे पोषण म्हणजे उद्याच्या सक्षम पिढीची गुंतवणूक आहे. निरोगी माता, सुदृढ बालक आणि सक्षम कुटुंबातूनच आरोग्यसंपन्न गावाची निर्मिती होईल. राष्ट्रीय पोषण माहाच्या निमित्ताने प्रत्येक कुटुंबाने पोषणाला प्राधान्य देऊन 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानात सक्रिय सहभाग घ्यावा," असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## नादुरुस्त हायमाष्ट दिव्यांनी पैठणला अंधार



तभा वृत्तसेवा

**पैठण दि २ :**पैठण शहरातील मोठ्या उघड्या क्षेत्रांना व परिसरांना एकाच ठिकाणाहून प्रभावीपणे उजळून काढण्यासाठी बसवलेली हायमाष्ट ( उच्च मानोरा दिवे ) नादुरुस्त झाल्याने परिसरात अंधार पसरला आहे. नगर परिषदेने या मोडकळीस आलेल्या दिव्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

तीर्थक्षेत्र पैठणला धार्मिक ठिकाणे, प्रवेश मार्ग,प्रमुख चौक, मुख्य रहदारीचे ठिकाणे, बाजारपेठ तसेच प्रमुख भागात्रा जोडणारे ठिकाणे अश्या विविध ठिकाणी जवळपास ८० च्या आसपास हायमाष्ट ( उच मनोरा दिवे ) बसवण्यात आले आहेत. अंधारातून प्रकाशाचे मार्ग दाखवणारे हे दिवे देखभाली अभावी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, घाटी परिसर, सह्याद्री चौक, नेहरू चौक, नाथमंदिर परिसर तसेच अनेक मोक्याची ठिकाणी सेटिंग बिघडून बंद पडली आहेत. वरखाली झालेली तसेच लाईट बंद पडलेल्या या दिव्यांना आता दुरुस्तीची गरज असून नगर परिषदेने या हायमाष्ट दिव्यांची तात्काळ दुरुस्ती करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. विशेष म्हणजे न.प. कडे दुरुस्ती साठी लागणारे लाईटर वाहन नसल्याची बाब समोर आली आहे. शहरातील नादुरुस्त असलेल्या हायमास्ट दिव्यांचे सुधारणीचे काम लवकरच हाती घेणार असल्याची माहिती नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसणकर यांनी दिली.

## एमपीएससी प्रश्नपत्रिका फुटीच्या आरोपांची उच्चस्तरीय चौकशी करा

### राष्ट्र क्रांती संघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध परीक्षांमधील प्रश्नपत्रिका फुटीचे आरोप व गैरव्यवहाराच्या तक्रारींची स्वतंत्र, निष्पक्ष व कालबद्ध उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी राष्ट्र क्रांती संघाने मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून छपाई, सुरक्षित साठवणूक आणि परीक्षा केंद्रापर्यंत वितरणाच्या संपूर्ण प्रक्रियेची तपासणी करावी. आयोगातील संबंधित अधिकारी व सदस्य, प्रश्नपत्रिका हाताळणारे कर्मचारी, परीक्षा केंद्र, ओएमआर विभाग, मशीन ऑपरेटर व व्यवस्थापक यांची भूमिका तपासावी. तसेच संशयास्पद उमेदवारांच्या निकालातील अचानक वाढ, परीक्षेपूर्वी मिळालेली माहिती आणि संबंधित व्यक्तींशी असलेले संपर्क यांचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.

२०१५ ते २०२६ या कालावधीत झालेल्या विविध भरती प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारांचीही तपासणी करावी. सीसीटीव्ही फुटेज, डिजिटल रेकॉर्ड व वितरण नोंदी सुरक्षित ठेवण्याचे निर्देश द्यावेत. दोषी आढळणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली. संघाचे संस्थापक अध्यक्ष अशोक (पप्पू) गीते, उपाध्यक्ष बळीराम राठोड, जिल्हाध्यक्ष फकिरा खरात, विभागीय संघटक पवन साबळे, विभागीय सचिव अमित भांगे, प्रचारक मनीष आवटे आणि प्रसिद्धी प्रमुख सुमित लकारे यांनी ही मागणी केली.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक संदीप निकम पाटील यांचा सूलभंजन येथे सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित संचालक संदीप निकम पाटील यांचा सुलीभंजन येथील कार्यकारी सोसायटी येथे सत्कार करताना. चेअरमन भागिनाथ भाऊ मरकड व्हाईट चेअरमन. शरफुद्दीन बँक इनस्पेक्टर गणेश नागे उदय सिंग राजपूत विठ्ठल मरकड ज्ञानेश्वर बारगळ रामानंद बोडके तुळशीराम जाधव धनाजी नागे सचिव भागिनाथ मिसाळ यांच्यासह नागरिक उपस्थित होते

## 20 वर्षांनंतर पुन्हा जुळले शाळेचे ऋणानुबंध; माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनात जुन्या आठवणींना उजाळा




तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** मुकुल हार संचलित मुकुल मंदिर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, एन-७, सिडको येथे सन २००६च्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन १५ ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. तब्बल २० वर्षांनंतर माजी विद्यार्थी आपल्या जुन्या शाळेत एकत्र आले आणि बालपणीच्या आठवणींना उजाळा देत जुन्या मित्र-मैत्रिणींशी मनमोकळा संवाद साधला.

यावेळी शाळेचे अध्यक्ष कमांडर अनिलजी सावे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुरेश परदेशी, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक जयंत चौधरी, सेवानिवृत्त शिक्षिका मेधा भगाडे, क्रीडा शिक्षक संदीप गायकवाड, तसेच उर्मिला जोंधळे आणि भावना विसपुते यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण कोळी यांनी केले. स्नेहसंमेलनाच्या आयोजनासाठी सुमित पगारे, निखिल सोनवणे, गौरी काळे-सोनवणे, श्रुती मोरे-कावळे, वर्षा जट्टे-तोडकरी, विशाल कानिटकर, मृणाल लालसरे, कौस्तुभ कुलकर्णी, विश्वास शेळके, स्वनिल क्षीरसागर आणि लक्ष्मण कोळी यांनी परिश्रम घेतले.

जा.क्र.जे-३/४११९/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
दिनांक :-20 AUG 2026

### NOTICE OF INQUIRY

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**

(FORM NO.२) (नमुना क्रमांक -२)

### चौकशी जाहिर नोटीस

(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, सन १९५० याचे कलम १९/२२/२८) सन २०२६ चा अर्ज क्रमांक २०८/२०२६
कलम किरकोळ

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था महिसा एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर पब्लिक ट्रस्ट, किराडपुरा, औरंगाबाद.
नोंदणी क्रमांक एफ :- १०८३१ (औ)
यांस जाफर नवाब पाशा शेख यांने कलम किरकोळ अन्वये भरलेला नमुना यांच्या संबंधात
गैरअर्जदार :- १) मोहम्मद गौस मो. नईस, रा. शरीफ कॉलनी, रोशन गेट, किराडपुरा, औरंगाबाद.

यांस, ज्या अर्थी मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात कलम किरकोळ अन्वये चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी तुम्हास ही जाहिर नोटीस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोंडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल. आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या शिक्क्यानिशी दिली.

(अधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

## एमजीएममध्ये 'आयईईई' आणि 'एब्स्को' डेटाबेसवर प्रशिक्षण सत्र संपन्न

### 450 हून अधिक प्राध्यापक, विद्यार्थी आणि संशोधकांनी घेतला सहभाग



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय आणि इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आयईईई आणि एब्स्को डेटाबेसेसचा प्रभावी वापर कसा करावा?' या विषयावर दोन दिवसीय प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठातील अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी हे विशेष सत्र घेण्यात आले.

या सत्रात व्यावसायिक प्रशिक्षक गौरव दाते यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. एमजीएम विद्यापीठाने विद्यार्थी, संशोधक आणि प्राध्यापकांसाठी अनेक उपयुक्त आंतरराष्ट्रीय ऑनलाईन डेटाबेसेस उपलब्ध करून दिले आहेत. या डिजिटल संसाधनांचा अचूक आणि जास्तीत जास्त वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक दाते यांनी याप्रसंगी दाखवले.

या प्रशिक्षणादरम्यान आयईईईमधील कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स व संबंधित विषयातील २०५ ट्रँझॅक्शन्स (ई-जर्नल्स) तसेच व्यवस्थापन (मॅनेजमेंट) क्षेत्राशी संबंधित ४९५ ई-जर्नल्स, १५ हजारांहून अधिक नामांकित कंपन्यांचे प्रोफाईल्स, केस स्टडीज आणि व्हिडिओ लेक्चर्स कशा पद्धतीने ॲक्सेस करावेत, याबद्दल अत्यंत सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्यात आले.

या महत्त्वपूर्ण प्रशिक्षणात संचालक डॉ.रणित किशोर, ग्रंथपाल सखाराम हारकळ, डॉ. गणेश सागरे, डॉ.मीनाक्षी राजपूत, प्रा.विजया अहिरे, प्रा. प्रमिला खरात, प्रा.मोहसीन अन्सारी यांच्यासह विद्यापीठाच्या सर्व ग्रंथालय कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या प्रशिक्षणाचा फायदा ४५० हून अधिक प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी व सर्व संबंधितांना झाला.

## सार्वजनिक उत्सवांमध्ये जल्लोष करण्यासाठी डीजे डॉल्बी सिस्टीम ऐवजी ब्लूटूथ हेडफोनचा वापर व्हावा : मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अहिल्यानगर :** सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये जल्लोष करण्यासाठी डीजे ध्वनीक्षेपकांऐवजी ब्लूटूथ हेडफोन, वायरलेस एअर बडस् असे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पर्सनल ऑडिओ डिवाइस वापरण्यात यावेत, या नाविन्यपूर्ण व शांततापूर्ण उत्सव संकल्पनेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात श्री ललवाणी यांनी म्हटले आहे की,

आपले महाराष्ट्र राज्य हे सण, उत्सव व धार्मिक परंपरा असलेले राज्य आहे. विविध सार्वजनिक उत्सव व सणानिमित्त नागरिक मोठ्या उत्साहाने एकत्र येतात. मात्र अलीकडील काळात सार्वजनिक उत्सव मिरवणुकांमध्ये कार्यकर्ते जल्लोष करण्यासाठी मोठ्या कर्कश्य व असह्य आवाजाचे डीजे डॉल्बी ध्वनिक्षेपक वापरतात. या कर्कश आवाजातून सहभागी कार्यकर्त्यांना आनंद व उत्साह मिळत असला तरी नजीकच्या ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण व इतर नागरिकांना या कर्कश ध्वनी प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागतो. असह्य आवाजामुळे अनेकदा जीवित हानी झालेली आहे.

या सर्व बाबींचा विचार करता ब्लूटूथ हेडफोन वायरलेस - इयर बडस् व पर्सनल ऑडिओ डिवाइस हा अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शांततापूर्ण उत्सव साजरा करण्यासाठी उत्तम पर्याय ठरू शकतो, असे निवेदनात म्हटले आहे.

## घोसला येथील स्वामी समर्थ सेवेकऱ्यांची त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी परिक्रमा पूर्ण



तभा.वृत्तसेवा

सोयगाव दि.२ सप्टेंबर

पवित्र श्रावण महिन्याचे औचित्य साधून घोसला येथील श्री स्वामी समर्थ सेवेकऱ्यांनी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे जाऊन ब्रह्मगिरी पर्वताची तब्बल ७० किलोमीटरची पायी प्रदक्षिणा यशस्वीरीत्या पूर्ण केली. या प्रवासादरम्यान राज्यातील बळीराजा व शेतकऱ्यांच्या सुख-समृद्धीसाठी तसेच उत्तम पर्जन्ययोगासाठी (चांगल्या पावसासाठी) गौतम ऋषी पर्वतावर विशेष जप, अनुष्ठान आणि महायज्ञ करण्यात आला.

७० किलोमीटरची खडतर पायी प्रदक्षिणा

हिंदू संस्कृतीत श्रावण महिन्यात देवदर्शन व पर्वतांच्या परिक्रमेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच भावनेतून घोसला येथून दोन लक्झरी बसद्वारे ६० स्वामी समर्थ सेवेकरी त्र्यंबकेश्वरसाठी रवाना झाले होते. सेवेकऱ्यांनी ब्रह्मगिरी पर्वतावरील मुख्य ब्रह्मगिरी मंदिर, गंगा-गोदावरी नदीचे उगमस्थान आणि भगवान भोलेनाथ यांनी जिथे जटा आपटून गंगेला प्रगट केले त्या अतिपवित्र स्थानाचे भावपूर्ण दर्शन घेतले. त्यानंतर सर्वांनी अत्यंत श्रद्धेने आणि शिस्तीत ७० किलोमीटरची पायी ब्रह्मगिरी प्रदक्षिणा पूर्ण केली.

बळीराजाच्या समृद्धीसाठी जप-अनुष्ठान

परिक्रमा पूर्ण केल्यानंतर गौतम ऋषी पर्वतावर सर्व ६० सेवेकऱ्यांनी एकत्रित येऊन जप,अनुष्ठान व यज्ञ पूर्ण केला. यंदा सर्वत्र चांगला पाऊस पडून शेतकरी वर्ग सुखी-समृद्ध व्हावा,या निसर्गकल्याणाच्या मुख्य उद्देशाने हा धार्मिक उपक्रम राबवण्यात आला.

हा संपूर्ण धार्मिक सोहळा संदीप माऊली यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.या उपक्रमात घोसला येथील सेवेकरी बाबुराव वाघ,संभाजी पाटील, प्रदीप पाटील, राजू तडवी, अरुण तडवी, रामभाऊ माळी, मधुकर गायकवाड, सर्जेराव पवार, निलेश गोपाळ, रितेश गवळी, जीवन गवळी यांच्यासह ६० सेवेकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सर्व सेवेकऱ्यांच्या या भक्तीमय व सामाजिक उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

## मतदारयादी विशेष पुनरीक्षणाला सुरुवात

**अहिल्यानगर :** 225 अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम (SIR) 2026 अंतर्गत मतदारयादीच्या पुनरीक्षणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्याची माहिती अहिल्यानगर उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार सुधीर उबाळे उपस्थित होते. श्री पाटील पुढे म्हणाले की, प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध झाल्यानंतर दावे व हरकती दाखल करण्यासाठी 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर 2026 हा कालावधी देण्यात आला आहे. अंतिम मतदारयादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मतदारसंघात सध्या 296 मतदान केंद्रे असून, पुनरीक्षण प्रक्रियेत एका नवीन मतदान केंद्राची भर पडली आहे. 300 पेक्षा कमी मतदार असलेली दोन केंद्रे व एका केंद्राचे समायोजन करण्यात आले आहे.

प्रारूप मतदारयादीत एकूण 2 लाख 46 हजार 424 मतदार असून त्यात 1 लाख 24 हजार 392 पुरुष, 1 लाख 22 हजार 4 महिला आणि 28 तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. मॅपिंग प्रक्रियेत 2 लाख 83 हजार 276 मतदारांची नोंद झाली असून, 2 लाख 46 हजार 418 मतदारांचे EF फॉर्म डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. दरम्यान, मतदारयादीतील 68,846 नोंदी (21.84 टक्के) ASDD अंतर्गत आढळल्या आहेत. संभाव्य सुनावणीसाठी 44,069 मतदारांची संख्या निश्चित करण्यात आली असून, सुनावणीचे ठिकाण महासैनिक लॉन्स, जुने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अहिल्यानगर निश्चित करण्यात आले आहे.

याव्यतिरिक्त नवमतदारांनी देखील आपला फॉर्म सहा आवश्यक कागदपत्रांसह भरून मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करून घ्यावे, असे आवाहन देखील यावेळी श्री पाटील यांनी केले.

## साई निर्माण ग्रुपच्या '12 ज्योतिर्लिंग संकल्प पूर्ती यात्रा'चे बनारस नगरीत ऐतिहासिक आणि उत्साहात स्वागत!



शिर्डी (प्रतिनिधी) साई निर्माण ग्रुपच्या वतीने आयोजित बहुचर्चित '१२ ज्योतिर्लिंग संकल्प पूर्ती यात्रा' ३१ ऑगस्ट रोजी पवित्र बनारस (काशी) नगरीत मोठ्या जल्लोषात आणि भक्तिमय वातावरणात दाखल झाली. या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण काशी नगरी काही काळासाठी 'साईमय' झाल्याचे पाहायला मिळाले. हजारो साई भक्तांच्या उपस्थितीत रंगलेल्या या सोहळ्याने बनारसच्या अध्यात्मिक वातावरणात एक वेगळाच उत्साह निर्माण केला.

यात्रा काशी नगरीत पोहोचताच स्थानिक साई भक्त राजेश अरोरा आणि इतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते साई पालखीची अत्यंत विधिवत महाआरती करण्यात आली. या महाआरतीच्या वेळी संपूर्ण परिसर मंत्रोच्चार आणि भक्तीच्या वातावरणात दुमदुमून गेला होता. आरतीनंतर ढोल-ताशांचा दणदणाट, बँड पथकाची सुरावटी आणि 'ओम साई नमो नमः जय जय साई नमो नमः' तसेच 'हर हर महादेव' च्या अखंड जयघोषात एक भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या पालखी सोहळ्यात हजारो साई भक्त उत्साहाने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या तालावर नाचत भक्तांनी यात्रेचा आनंद द्विगुणित केला.

शोभायात्रा निघून श्री काशी विश्वनाथ मंदिराकडे मार्गस्थ झाली. संपूर्ण काशी विश्वनाथ कॉरिडॉर साई भक्तांच्या अफाट गर्दीने फुलून गेला होता. यात्रेत सहभागी झालेल्या सर्व भाविकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आराध्य दैवत श्री काशी विश्वनाथाचे दर्शन घेतले. बाबांच्या व महादेवाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर निनादला होता.

साई निर्माण ग्रुपच्या वतीने सर्व यात्रेकरूंच्या राहण्याची, जेवणाची आणि सुलभ दर्शनाची अत्यंत उत्तम सोय करण्यात आली होती. या भव्य यात्रेत महिला वर्ग आणि ज्येष्ठ नागरिकांची लक्षणीय उपस्थिती विशेष आकर्षण ठरली. ही यात्रा यशस्वी करण्यासाठी साई निर्माण ग्रुपचे अध्यक्ष विजयराव कोते, पंकज लोढा, ताराचंद कोते तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मेहनत व परिश्रम घेत आहेत.. हा सोहळा केवळ एक धार्मिक यात्रा न राहता, भक्ती, संस्कृती आणि शिस्तीचा एक अद्वितीय संगम ठरला, ज्याची गोड आठवण बनारसवासी आणि यात्रेकरूंच्या मनात कायम राहील.

## आता प्रथमच राहात्यातील डॉ. कानडे हॉस्पिटल येथे लैंगिक समस्यांवर आधुनिक उपचार !

**राहाता (वार्ताहर ) :** येथील डॉ. कानडे हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक लेझर एच.आय.एफ.यु , एच.आय .एफ. इ ,एम चेअर , पी.डी.ओ थ्रेड व शॉक वे थेरपी या आधुनिक पद्धतीचा वापर करून लैंगिक समस्या असणाऱ्या रुग्णांवर आता प्रथमच राहाता शहरात डॉ कानडे हॉस्पिटल येथे उपचार करण्यात येणार असल्याची माहिती . प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ दत्ता कानडे व भूलतज्ञ स्वाती कानडे यांनी दिली.





या आधुनिक पद्धती बाबत माहिती देताना डॉ. कानडे म्हणाले राहात्यात गेल्या २६ वर्षांपासून रुग्णसेवेत कार्यरत असलेल्या डॉ. कानडे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर, येथे महिला व पुरुषांच्या लैंगिक आरोग्याशी संबंधित विविध समस्यांवर आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपचार उपलब्ध करून देण्यासाठी अत्याधुनिक उपचार सुविधा सुरू करण्यात आली आहे.

## अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या विशेष दुरुस्तीसाठी 3 कोटी 54 लाखांची प्रशासकीय मान्यता

### अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पातून वाहून जाणारे पाणी उजव्या कालव्यातून ठाणा पिकअप वेअरमध्ये सोडण्याचा मार्गमोकळा

तभा.वृतसेवा

सोयगाव,दि.२ सप्टेंबर

अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पातून वाहून जाणारे पाणी उजव्या कालव्यातून ठाणा पिकअप वेअरमध्ये सोडण्याच्या दृष्टीने मुख्य कालव्याच्या विशेष दुरुस्तीच्या कामास ३ कोटी ५४ लाख ६१ हजार ६५० रुपयांची प्रशासकीय मान्यता शासनाने दिली आहे. या निर्णयामुळे कालव्याची वहन क्षमता वाढण्यासह सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होण्यास मोठी मदत होणार आहे.

अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्प हा वाघूर नदीवर अजिंठा गावाच्या दक्षिणेस बुलढाणा रोडवर सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असून सन १९८४ मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. प्रकल्पाची पूर्ण जलाशय पातळी ८.४३ दलघमी असून पूर्ण जलाशय पातळीचा निव्वळ साठा १.६५ दलघमी, तर मृत साठा ०.८८ दलघमी इतका आहे.प्रकल्पाच्या सांडव्याची लांबी ३०० मीटर असून सांडव्याचा संबंधित विसर्ग ७८१.१७ घमी/सेकंद इतका आहे.



प्रकल्पांतर्गत ५.२ किलोमीटर लांबीचा उजवा कालवा असून त्याची विसर्ग क्षमता १.७२ घमी/सेकंद इतकी आहे. कालव्याची सर्व बांधकामे सन १९८४ पूर्वीच पूर्ण करण्यात आली आहेत.

मात्र, मुख्य कालव्याची अनेक वर्षांपासून दुरुस्ती झालेली नसल्याने कालव्याची वहन क्षमता कमी झाली होती. त्यामुळे कालव्याचे अस्तरीकरण करणे, भराव दुरुस्ती करणे, कालव्यावरील विमोचक दुरुस्ती करणे, तसेच कालव्यावरील नाला क्रॉसिंग व रोड क्रॉसिंगची दुरुस्ती करणे आदी कामे प्रस्तावित करण्यात आली होती.

सदर कामे पूर्ण झाल्यानंतर कालव्याची वहन क्षमता वाढून पाण्याची गळती व अपव्यय कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच अवर्षणग्रस्त, दुष्काळी भाग व डोंगराळ भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल. याशिवाय आजूबाजूच्या गावांना पिण्याच्या पाण्यासाठीही या पाण्याचा उपयोग होणार असून, अंदाजे १६३ हेक्टर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर अजिंठा अंधारी मध्यम प्रकल्पातून वाहून जाणारे पाणी प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून ठाणा पिकअप वेअरमध्ये सोडण्याच्या दृष्टीने मुख्य कालव्याच्या दुरुस्ती कामाचा विशेष दुरुस्ती प्रस्ताव शासनाकडे सादरकरण्यात आलेला होता त्याअनुषंगाने शासनाने या प्रस्तावास मान्यता देत रु. ३,५४,६१,६५०/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

आमदार अब्दुल सत्तार यांनी या महत्त्वपूर्ण कामासाठी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केल्याने अखेर हा निर्णय घेण्यात आला असून, या कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी अधिक प्रभावीपणे पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## अग्रलेख

# बदलत्या काळाचे भान

विचारांशी निष्ठा ठेवतानाच काळानुरूप होत असलेल्या बदलांचा स्वीकार करीत पुढे जाणे, हीच राजकीय पक्षाच्या जिवंतपणाची खूण असते. मूळ विचारांशी तडजोड न करता बदलती परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न भाजपा सातत्याने करीत आली आहे आणि त्यामुळेच तो यशस्वी राजकीय पक्ष ठरला आहे. भारतातील इतर राजकीय पक्षांची तुलना केली तर असे दिसते की, भाजप हा व्यापक वैचारिक अधिष्ठानावर उभा असलेला एकमेव पक्ष आहे. काळाची पावले ओळखणे, समाजाचे बदलते मन समजून घेणे आणि त्यानुसार संघटनेच्या कार्यपद्धतीत आवश्यक बदल करणे, ही भाजपाची ताकद आहे. पुण्यात नुकत्याच झालेल्या भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत संघटनात्मक आढाव्याच्या पल्याडचे मंथन या पृष्ठभूमीवर झाले. केंद्रात, राज्यात आणि बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्तेत असतानाही पक्षाने आत्ममग्न न होता आगामी राजकीय आव्हानांचा विचार करणे, कार्यकर्त्यांना नव्या काळाची जाणीव करून देणे आणि संघटनेला अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न करणे, हे या बैठकीचे वैशिष्ट्य.

राजकारणाचा चेहरामोहरा आज झपाट्याने बदलत आहे. पूर्वी राजकीय पक्ष आणि जनतेमधील संवाद सभा, मेळावे, पत्रके, वृत्तपत्रे आणि प्रत्यक्ष भेटीगाठी यांच्या माध्यमातून होत असे. त्या संवादात आता समाजमाध्यमांनी जागा घेतली आहे. एखादी माहिती काही क्षणांत लाखो लोकांपर्यंत पोहोचते. त्याच वेगाने गैरसमज, अर्धसत्य किंवा खोटी माहितीही पसरू शकते. त्यामुळे आजच्या राजकारणात केवळ चांगले काम करणे पुरेसे नाही; ते लोकांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचवणेही तितकेच आवश्यक आहे. याच वास्तवाची जाणीव भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत सर्वांना प्रकर्षाने करून देण्यात आली. प्रत्येक आरोपाला उत्तर देत बसण्यापेक्षा स्वतःची भूमिका जनतेसमोर अधिक प्रभावीपणे मांडण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. राजकारणात विरोधक काय बोलतात, यापेक्षा आपण जनतेशी काय आणि किती परिणामकारकपणे बोलतो, हे महत्त्वाचे ठरू लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना माध्यमांच्या बदलत्या स्वरूपाची जाणीव करून देताना याच नव्या वास्तवाकडे लक्ष वेधले. माध्यम बदलले म्हणून विचार बदलण्याची गरज नाही; मात्र विचार मांडण्याची भाषा, पद्धत आणि वेग बदलण्याची आवश्यकता आहे. आजचा मतदार केवळ भाषण ऐकून निर्णय घेत नाही. तो माहिती तपासतो, विविध पर्यायांची तुलना करतो, सरकारच्या निर्णयांचा आपल्या जीवनावर झालेला परिणाम पाहतो आणि त्यानंतर आपले मत बनवतो. त्यामुळे विकासकामे, कल्याणकारी योजना आणि पायाभूत सुविधांची माहिती फक्त आकडेवारीच्या भाषेत नव्हे, तर सामान्य माणसाला समजेल अशा सोप्या आणि विश्वासार्ह भाषेत पोहोचवावी लागणार आहे, हेच मुख्यमंत्र्यांना सांगावयाचे आहे. गेल्या दशकभरात भाजपाच्या केंद्रातील व राज्यांमधील सरकारांकडून झालेल्या विकासकामांचा मोठा पट जनतेसमोर आहे. मात्र, काम झाले म्हणजे त्याची माहिती आपोआप पोहोचतेच असे नाही. त्यासाठी प्रभावी संवाद आवश्यक असतो. जनतेच्या दैनंदिन जीवनात विकासामुळे काय बदल झाला, एखाद्या योजनेचा लाभ कोणाला मिळाला, एखाद्या पायाभूत सुविधेमुळे किती वेळ आणि पैसा वाचला, हे सांगितले तर विकासाच्या मुद्द्याला विश्वासार्हता प्राप्त होते.

'नॅरेटिव्ह'च्या राजकारणाकडे पाहण्याची दृष्टीही या बैठकीतून स्पष्ट झाली. प्रत्येक वेळी बचावात्मक भूमिका घेण्यापेक्षा सकारात्मक आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका मांडणे अधिक प्रभावी ठरते. विरोधकांच्या आरोपांना उत्तर देणे आवश्यक आहेच; पण त्याहून महत्त्वाचे आहे ते स्वतःचा अजेंडा सांगणे. आपल्याला देश आणि राज्याला कोणत्या दिशेने न्यायचे आहे आणि सामान्य नागरिकांच्या आयुष्यात कोणता बदल घडवायचा आहे, हे सातत्याने सांगणे अत्यंत आवश्यक आहे. सकारात्मक राजकारणाची खरी ताकद इथेच आहे. या बैठकीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संघटनात्मक बदलांवर झालेले मंथन. कार्यकर्त्यांच्या कामाचे स्वरूप काळानुसार बदलत आहे. नव्या पिढीतील कार्यकर्ता तंत्रज्ञानाशी परिचित आहे, समाज माध्यमांचा वापर करतो, नव्या सामाजिक प्रश्नांची जाण ठेवतो आणि लोकांशी संवाद साधण्यासाठी पारंपरिक चौकटीपलीकडे जाण्यास तयार आहे. अशा कार्यकर्त्याला जबाबदारी द्यावी लागेल, निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घ्यावे लागेल आणि त्याच्या क्षमतेला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे लागेल, असा या मंथनाचा सूर होता. याचा अर्थ जुन्या कार्यकर्त्यांचे महत्त्व कमी करणे असा अजिबात होत नाही. संघटनात्मक परंपरा आणि नव्या पिढीची ऊर्जा यांचा संगम घडवणे ही खरी गरज आहे. अनुभवाशिवाय दिशा मिळत नाही आणि नव्या ऊर्जेशिवाय वेग मिळत नाही. त्यादृष्टीने पक्ष सकारात्मक विचार करीत आहे, हे सुचिन्ह मानले पाहिजे.

खोट्या नॅरेटिव्हच्या लढाईत आक्रमकपणे पुढे जाण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले, तर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी हिंदुत्व टिकवण्यासाठी भाजपाचा जन्म झाल्याचे सांगत पक्षाच्या वैचारिक भूमिकेचे पुनश्च अधोरेखन केले. विचारांमध्ये ठामपणा राखताना संवादात लवचीकता असणे ही आजच्या राजकारणाची गरज आहे. भाजपासमोर अनेक राजकीय आव्हाने आहेत. बदलत्या काळातील मतदारांची मानसिकता, नव्या पिढीच्या अपेक्षा, डिजिटल माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचणारे राजकारणाचे स्वरूप आणि विरोधकांकडून होणारी राजकीय टीका या सगळ्यांचा विचार भाजपाला करावा लागणार आहे. या प्रत्येक आव्हानात विस्ताराची संधीही आहे. विविध समाजघटकांशी संवाद वाढवणे, तरुणांना संघटनेशी जोडणे, महिलांचा सहभाग अधिक व्यापक करणे, व्यावसायिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या पिढीशी संपर्क वाढवणे, ही भाजपाच्या पुढच्या वाटचालीची दिशा असू शकते. सध्या कोणताही राजकीय पक्ष यासंदर्भात विचार करताना दिसत नाही. भाजपाला फार मोठी संधी आहे. लोकशाहीमध्ये विरोधक असणारच हे गृहीत धरले पाहिजे. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे, आवश्यक तेथे टीका स्वीकारणे आणि आपल्या भूमिकेनुसार ठाम स्पष्टीकरण देणे यातून पक्ष अधिक मजबूत होतो. आत्मविश्वास असलेली संघटना टीकेला घाबरत नसते; उलट ती टीकेतून आत्मपरीक्षणाची संधी शोधते. भाजपाने बदलत्या राजकीय वास्तवाचा स्वीकार करून आणि टीकाटिप्पणी पचवूनच आजपर्यंतची वाटचाल केली आहे आणि ती पुढेही कायम राहणार आहे, हे भान सर्वांना ठेवावे लागेल. पुण्यातील बैठकीत नव्या काळाच्या दृष्टीने चिंतन झाले. सध्या सत्ता असल्यामुळे आत्मसंतुष्ट न राहता पुढील आव्हानांचा विचार करणे, कार्यकर्त्यांना नव्या माध्यमांचे भान देणे, वैचारिक भूमिका अधिक ठामपणे मांडणे आणि संघटनेला काळाच्या वेगाशी जोडण्याचा प्रयत्न या बैठकीतून झाला. राजकारणात कालचा विजय महत्त्वाचा असतो, पण पुढचा विजय मिळवण्यासाठी उद्याचा समाज समजून घेणे अधिक महत्त्वाचे असते. विजय प्राप्त केल्यावर त्याची सार्थता सिद्ध करावी लागते आणि तसे झाले तरच पुढच्या विजयाच्या वाटा अधिक विस्तृत होतात. सुदैवाने भाजपाच्या नव्या पिढीतील नेत्यांनाही या वास्तवाचे भान आहे. पाळेमुळे जमिनीत घट्ट असतील, तर संकटांची भीती बाळगण्याचे कारण नसते. तेच वेगळ्या शब्दांत नेत्यांनी बोलून दाखविले याचा अर्थ बदलत्या काळाचे भान भाजपाकडे आहे. तेच या पक्षाच्या पुढील वाटचालीला अधिक सामर्थ्य देणारे ठरेल, यात शंका नाही. ■

## विशेष

# इमारतींनाही मिळणार ऊर्जा रेटिंग

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतात घर किंवा व्यावसायिक इमारत खरेदी करताना आपण आजवर स्थान, किंमत, बांधकामाचा दर्जा, सुविधा, पार्किंग, सुरक्षा, संपर्क यंत्रणा अशा अनेक निकषांचा विचार करतो; मात्र त्या इमारतीचा ऊर्जा वापर किती आहे, ती किती वीज वाचवते, तिच्यामुळे कार्बन उत्सर्जन किती कमी होते किंवा भविष्यातील वीजबिल किती कमी येऊ शकते, हा प्रश्न फारसा विचारला जात नाही. आता ही परिस्थिती बदलण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने २० हजार चौरस मीटर किंवा त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र असलेल्या नवीन व्यावसायिक, कार्यालयीन आणि निवासी इमारतींसाठी ऊर्जा कार्यक्षमतेचे रेटिंग अनिवार्य करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नाही, तर भारताच्या शाश्वत विकास, ऊर्जा सुरक्षा आणि हवामान बदलाशी लढण्याच्या धोरणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. ऊर्जा मंत्रालयाने ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ आणि २०२२ मधील सुधारणांच्या आधारे हा मसुदा प्रसिद्ध केला आहे. यामुळे मोठ्या इमारतींसाठी ऊर्जा कार्यक्षमतेचे एकसमान निकष तयार होतील. प्रस्तावानुसार पात्र इमारतींना किमान तीन-स्टार बीईई (ब्यूरो ऑफ एनर्जी इफिशिअन्सी) रेटिंग किंवा त्यास समतुल्य मान्यताप्राप्त रेटिंग मिळवणे बंधनकारक असेल.

गेल्या दोन दशकांमध्ये देशात मोठ्या प्रमाणावर उंच इमारती, आयटी पार्क, शॉपिंग मॉल, रुग्णालये, शैक्षणिक संकुले आणि निवासी टाऊनशिप उभारल्या गेल्या. या सर्व इमारतींमध्ये वातानुकूलन यंत्रणा, लिफ्ट, प्रकाशयोजना, डेटा सेंटर्स आणि विविध विद्युत उपकरणांमुळे मोठ्या प्रमाणावर विजेचा वापर होतो. भारताच्या एकूण वीजवापरात इमारत क्षेत्राचा वाटा सातत्याने वाढत आहे. भविष्यात स्मार्ट शहरे, डिजिटल अर्थव्यवस्था आणि वाढती नागरी लोकसंख्या यामुळे हा वापर आणखी वाढणार आहे. त्यामुळे ऊर्जा कार्यक्षमतेला पर्याय नाही. आजही भारतात हरित इमारतींच्या प्रमाणपत्रासाठी विविध संस्था कार्यरत आहेत. 'गृह', आयजीबीसी', 'लीड,' 'जेम' यांसारख्या संस्था ठरावीक निकषांनुसार प्रमाणपत्रे देतात; मात्र प्रत्येक संस्थेचे मूल्यमापन वेगळे असल्याने दोन इमारतींच्या ऊर्जा कार्यक्षमतेची थेट तुलना करणे कठीण जाते.



योग्य दिशेने इमारतीची रचना, नैसर्गिक प्रकाशाचा वापर, उष्णतारोधक भिंती, ऊर्जा कार्यक्षम काच, आधुनिक 'हॅवॅक' प्रणाली, एलईडी प्रकाशयोजना, स्मार्ट सेन्सर्स, पावसाचे पाणीसाठवण, सौरऊर्जेचा वापर आणि ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली यांचा समावेश केल्यास वीजवापर कमी होऊ शकतो. सुरुवातीला हरित तंत्रज्ञानासाठी काही प्रमाणात जास्त गुंतवणूक करावी लागली, तरी पुढील अनेक वर्षे वीजबिलात होणारी बचत, देखभाल खर्चातील कपात आणि मालमत्तेचे वाढते मूल्य यामुळे ही गुंतवणूक फायदेशीर ठरते. अनेक अभ्यासांनुसार ऊर्जा कार्यक्षम इमारतींचा ऑपरेटिंग खर्च पारंपरिक इमारतींपेक्षा २० ते ४० टक्क्यांपर्यंत कमी असू शकतो. त्यामुळे हा खर्च नसून दीर्घकालीन गुंतवणूक आहे. पर्यावरणीय दृष्टिकोनातून या निर्णयाचे महत्त्व अधिक आहे. ऊर्जा वाचवणे म्हणजे नवीन वीजनिर्मितीची गरज कमी करणे. त्यामुळे कोळशावरील अवलंबित्व कमी होईल. कार्बन उत्सर्जनात घट होईल आणि वायुप्रदूषणही कमी होण्यास मदत होईल. आज घर खरेदी करणारा ग्राहक अनेकदा केवळ सौंदर्य आणि सुविधांकडे लक्ष देतो; परंतु भविष्यात ऊर्जा रेटिंग हासुद्धा महत्त्वाचा निकष ठरू शकतो. रेफ्रिजरेटर, एसी किंवा वॉशिंग मशीन खरेदी करताना जसे 'बीईई स्टार रेटिंग' पाहिले जाते, त्याचप्रमाणे इमारतीची ऊर्जा कार्यक्षमता पाहून ग्राहक निर्णय घेऊ शकतील. त्यामुळे बांधकाम व्यावसायिकांमध्येही गुणवत्तापूर्ण आणि ऊर्जाबचत करणाऱ्या इमारती उभारण्याची स्पर्धा वाढेल; मात्र या धोरणासमोर काही आव्हानेही आहेत. सर्वप्रथम, ऊर्जा कार्यक्षम बांधकामासाठी आवश्यक साहित्य आणि तंत्रज्ञानाचा खर्च तुलनेने जास्त असतो. विशेषतः मध्यम आकाराच्या विकासकांसाठी ही अतिरिक्त आर्थिक जबाबदारी ठरू शकते. सरकारने अशा प्रकल्पांसाठी करसवलत, कमी व्याजदरावरील कर्ज किंवा आर्थिक प्रोत्साहन दिल्यास या धोरणाची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल. दुसरे आव्हान म्हणजे निरीक्षण आणि अंमलबजावणी. केवळ प्रमाणपत्र देऊन काम भागणार नाही. प्रस्तावानुसार 'बीईई'कडून तपासणी किंवा नमुना पडताळणी केली जाणार आहे; परंतु देशभरातील हजारो मोठ्या इमारतींची नियमित तपासणी करण्यासाठी सक्षम मनुष्यबळ, तांत्रिक कौशल्य आणि डिजिटल यंत्रणा उभी करावी लागेल. अन्यथा, कागदोपत्री रेटिंग आणि प्रत्यक्षातील ऊर्जावापर यामध्ये मोठी तफावत राहू शकते. तिसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे जनजागृती. ग्राहकांना ऊर्जा रेटिंगचे महत्त्व समजले नाही, तर ही प्रणाली केवळ औपचारिकता ठरेल. आज वाहनांच्या सुरक्षिततेसाठी 'क्रॅश टेस्ट रेटिंग' किंवा घरगुती उपकरणांसाठी 'स्टार रेटिंग'बाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाली, त्याचप्रमाणे इमारतींच्या ऊर्जा कार्यक्षमतेबाबतही व्यापक जनजागृती करावी लागेल. भारताच्या रिअल इस्टेट क्षेत्रासाठी हा बदल ही मोठी संधी आहे. जागतिक स्तरावर 'ग्रीन फायनान्स' आणि 'ईएसजी' (एन्व्हायर्न्मेंटल, सोशल ॲण्ड गव्हर्नन्स) निकषांना महत्त्व मिळत आहे. आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार ऊर्जा कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांमध्ये अधिक गुंतवणूक करण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळे भारतीय बांधकाम क्षेत्राने ही संधी साधून हरित बांधकामात जागतिक स्पर्धात्मकता मिळवावी. यासोबतच राज्य सरकारे, महानगरपालिका आणि नगररचना विभाग यांनीही आपल्या इमारत परवानगी प्रक्रियेत ऊर्जा कार्यक्षमतेला अधिक महत्त्व द्यायला हवे. 'स्मार्ट सिटी', अमृत, पीएम आवास योजना आणि औद्योगिक कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांमध्ये 'ईसीएसबीसी'चे निकष प्रभावीपणे लागू झाल्याचा दूरगामी परिणाम देशाच्या ऊर्जा सुरक्षेवर होईल. या प्रस्तावाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पारदर्शकता. इमारतीचे ऊर्जा रेटिंग जाहिरातींमध्ये आणि विक्री साहित्यामध्ये नमूद करणे बंधनकारक असल्याने ग्राहकांना वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध होईल. त्यामुळे चुकीच्या दाव्यांना आळा बसेल आणि बाजारात गुणवत्ता आधारित स्पर्धा वाढेल. ऊर्जाकार्यक्षम इमारतींची मागणी वाढल्यास विकासकांनाही दर्जेदार बांधकाम करण्याशिवाय पर्याय राहणार नाही.

ऊर्जा कार्यक्षमतेला आपण बांधकाम संस्कृतीचा अविभाज्य भाग बनवू शकलो, तर भविष्यात भारतातील इमारती केवळ उंचच नव्हे, तर अधिक बुद्धिमान, पर्यावरणपूरक आणि शाश्वतही ठरतील. अशा इमारतीच भारताच्या हरित अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया घालतील आणि ऊर्जा बचतीपासून हवामान संरक्षणापर्यंत अनेक राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# आवाज 'कमी कर' डीजे तुला...!

आम्हाला चर्चा करायची प्रचंड आवड; प्रत्यक्ष कृती करताना मात्र रीतीभाती, प्रथा-परंपरा आम्ही विसरतो. सार्वजनिकरीत्या उत्सव साजरे करणे, ही महाराष्ट्राची परंपरा आहे. हे करताना त्यात विकृतीचे दर्शन आम्हीच घडवितो. एकीकडे संस्कृती जपण्याच्या गप्पा करताना, वेगळं करण्याच्या नादात विकृतीला खतपाणी घालत असू तर संस्कृती आणि विकृतीमध्ये संघर्ष पेटविणारे आपणच ना? अशावेळी सांस्कृतिक शहर असलेल्या पुणेकरांना रस्त्यावर येत 'डीजे'चा विरोध करण्याची वेळ आली असेल तर महाराष्ट्रातील भागाभागात हा कित्ता का गिरविला जाऊ नये? सांस्कृतिक पद्धतीने सण-उत्सव साजरे होऊ शकतात, हे फक्त पुणेकरच नव्हे महाराष्ट्रातील प्रत्येक जण दाखवू शकतो.

काळानुरूप बदलले पाहिजे. नवीन गोष्टींचा स्वीकार करीत पुढे गेले पाहिजे, यात कुणाचेही नसावे. पण प्रथा-परंपराही विसरता कामा नये. महाराष्ट्राची संस्कृती आपण जाणतो. महाराष्ट्रातील सण-उत्सवांची परंपरा देश-विदेशातही चर्चिली जाते. विदेशात आमच्या संस्कृतीला डोक्यावर घेऊन नाचणारी मंडळी असताना, आम्ही महाराष्ट्रातच आमचे पारंपरिक सण साजरे करताना संस्कृती विसरत चाललो की काय, असे वाटू लागले आहे. आज संस्कृती विरुद्ध विकृती असा संघर्ष अप्रत्यक्षरीत्या पेटल्याचे दिसते. त्याला कारणीभूत कोण, असा प्रश्न आल्यास बरीच बोटे ही आपल्याकडे असतील.

सध्या डीजेचा अतिरेक हा विषय कळीचा बनला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव असो वा कोणत्याही धर्मीयांचा उत्सव, सण, लग्नकार्य किंवा मिरवणुकांचा डीजे अविभाज्य भाग झाला आहे. एखादवेळी परंपरागत एखादी गोष्ट कमी असेल, पण डीजेचा साज पूर्ण हवा. केवळ डीजेच नाही, तर त्यासोबत लागलेले लेझर लाईटही! डीजेचा कर्णकर्कश आवाज आणि डोळ्याचे पडदे फाडून टाकणाऱ्या लेझर लाईटचा प्रकाश आज आमच्या सण-उत्सवांना कोणत्या दिशेने घेऊन जातो आहे, याचा विचार व्हायलाच हवा. आज आवाज वाढव नव्हे, तर आवाज 'कमी कर' डीजे तुला...! म्हणण्याची वेळ आली आहे. नाही असं नाही, सण-उत्सव आधीही साजरे होत होते, पण तेव्हा पारंपरिक वाद्यांचा सहभाग होता. ढोलताशा, लेझिम, झांज, संबळ यांना मानाचे स्थान होते. हे केवळ वाद्य नव्हते तर यांच्या ध्वनीने अंगात वेगळी ऊर्जा आणि उत्साह संचारत होता. भक्ती, सभ्यता आणि सामाजिक सलोखा जोपासणारे साधन होते. आज विपरीत झाले आहे. डीजेचा कानठळ्या बसविणारा आवाज हृदयविकार, बहिरेपणाचे कारण बनले आहे. अश्लील नाचगाणी, विचित्र अंगविक्षेप यामुळे उत्सवांमधील मांगल्याचे वातावरण विकृतीच्या दिशेने नेत आहे. अशा ठिकाणी नाचताना होणारे मद्यप्राशन व्यसनाधीनतेला खतपाणी घालत आहे. संस्कृतीच्या नावाखाली विकृतीला आम्ही घातलेली साद आणि त्याला सण-उत्सवाचा अविभाज्य अंग बनवून उत्सवांचे बदलवित असलेल स्वरूप आपल्यासाठी घातक ठरत आहे, याचा विसर आम्हाला पडला आहे.

डीजेशिवाय आमचे सण-उत्सव साजरे होऊ शकत नाहीत का? कधीकाळी परंपरागत पद्धतीने साजऱ्या होणाऱ्या सणांचा आम्हाला विसर पडला आहे का? असं असेल, तर मग संस्कृती आणि धार्मिकतेचा आव आणयचाच कशाला? डीजेचे दुष्परिणाम जीव घेण्यापर्यंत पोहोचले आहेत. लेझर लाईट तर डोळ्यांचे पडदे फाडण्याचे काम करीत आहे. तरीही त्याच तालावर आम्ही नाचणार असू तर आम्ही आमची संस्कृती विकृतीच्या दिशेने घेऊन जातो आहोत, हे नक्की! पुण्यात लोकांना रस्त्यावर येऊन डीजे नको, असे म्हणावे लागत आहे. राजकारणीही त्याला प्रतिसाद देत असतील तर सकारात्मक परिवर्तन म्हणावे लागेल. पण केवळ पुणेच महाराष्ट्राला सण-उत्सव सांस्कृतिक पद्धतीने साजरे करू शकते, हे दाखवू शकते असे नाही तर संपूर्ण महाराष्ट्र संस्कृतीची कास धरून आहे. डीजे लोकांच्या जिवावर उठलाय, अनेक बँड पथकांच्या रोजगारावर वरवंटा फिरलाय. काहींसाठी डीजे हेच उपजीविकेचे साधन असेलही, पण मर्यादा आणि नियमांचे पालन व्हायला नको का? ज्यांच्याकडे पालन करण्याची आणि कायद्याची जाणीव करून देण्याचे अधिकार आहेत, त्यांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. याहीपेक्षा आता त्या मंडळांनाच विचार करावा लागणार आहे, जे १० दिवस बाप्पाची मनोभावे पूजा करून निरोपाला डीजेचा गोंधळ घालतात. शेवटी संस्कृतीचे वाभाडे मिरवणुकीतच रस्त्यावर दिसतात ना? ■

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्रावणी उपाकर्म संस्कार विधी

**प्रा. दिलीप जोशी**

हिंदू धर्मात श्रावण महिन्याला विशेष महत्त्व आहे. विविध सण आणि उत्सव, व्रतवैकल्ये आणि विधी या महिन्यात सर्व भक्त श्रद्धेने करतात. यातीलच एक सर्वांगसुंदर विधी म्हणजे श्रावणी उपाकर्म. खरं म्हणजे श्रावणी उपाकर्म हा केवळ विधी नसून तो संस्कार आहे. श्रावण महिन्यातील पौर्णिमेला अर्थात राखी पौर्णिमेला हा विधी केला जातो. जर राखी पौर्णिमेला ग्रहणादी असेल तर हा विधी श्रावण कृ. पंचमीला केला जातो. श्रावणी हा शब्द दोन अर्थांनी आहे. हा विधी श्रावणातील पौर्णिमेला होतो म्हणून श्रावणी शब्द घेतला आहे. श्रावण महिन्यातील विधिपूर्वक अंतरंग बहिरंग शुचिता म्हणजे श्रावणी उपाकर्म विधी. दुसरे म्हणजे श्रवण म्हणजे ऐकणे. श्रवण श्रावण, स्वाध्याय आणि गुरू उपदेश किंवा प्रवचन अशा अर्थांनी श्रावणी शब्द आहे.

उपाकर्म म्हणजे उप+आ+कर्म. इथे उप म्हणजे सान्निध्य, समिपता म्हणजे जवळ बसणे. आ म्हणजे समंतात किंवा पर्यंत. कर्म हे वैदिक यज्ञिय कर्मणी होतो. म्हणजे गुरूंच्या, ऋषींच्या सान्निध्यात वेदांच्या समिप नेणारे यज्ञकर्म होय. प्राचीन काळात श्रावणी पौर्णिमेला गुरुकुलात श्रावणी उपाकर्म केले जात असे. या दिवशी गुरूंच्या निकट बसून अध्ययन प्रारंभ होत असे. 'अध्ययनस्य उपाकर्म उपाकरणं वा' म्हणजे या दिवशी अरण्यात राहणाऱ्या ऋषींच्या गुरुकुलात पालक आपल्या पाल्यांना घेऊन अध्ययनासाठी येत असत. आधुनिक भाषेत पालक विद्यार्थ्यांना घेऊन शाळेत जाणे. सामान्य जनता स्वाध्यायासाठी विद्वत मंडळींकडे जात असे.

**श्रावण्यां प्रोष्ठपद्यां वाऽप्युपाकृत्य यथाविधि।**
**युक्तश्छन्दांस्यधीयीत मासान् विप्रोऽर्धपञ्चमान्॥**

थोडक्यात श्रावण महिन्यांत उपकर्मानंतर या दिवशी विद्यार्थ्यांच्या अध्ययनास प्रारंभ होत असे. वेदाध्ययन प्रारंभ करण्यापूर्वी हा विधी केला जात असे. तसेही हा कालावधी शेतीतील बहुतेक कामे आटोपून काही काळ सर्वांना मिळणारा आहे. त्यामुळे माता-पिता मुलांना अध्ययनासाठी आश्रमात नेवून सोडू शकत असत. म्हणून श्रावण पौर्णिमा हा अध्ययन प्रारंभ करण्याचा दिवस निवडला असावा.

**काय आहे हा विधी ?**

'अथातोऽध्यायोपाकर्म॥' हा विधी गुरुकुलात होत असे. हल्ली मंदिर, नदीतट, सरोवरावर केला जातो. तीर्थस्नान, सूर्योपस्थान, ऋषिपूजन, ऋषितर्पण, यज्ञोपवीत परिवर्तन, वेदश्रवण, वेदाध्ययन प्रारंभ असा या विधीचा क्रम आहे. सुरुवातीलाच विधियुक्त स्नान ज्याला 'दशविध स्नान' म्हणतात. या स्नानविधीत विविध दहा द्रव्यांचा वापर होतो; ज्यामुळे आरोग्याला हितकारक लेपन केले जाते. एका अर्थाने हे आयुर्वेदिक स्नान आहे; ज्यात मृत्तिका म्हणजे माती शरीरावर लेपन करून स्नान, गोमय लेपन करून स्नान, भस्म लेपन, गोमूत्र, गोदुग्ध, गोदधी, गोघृत, मधू, कुश म्हणजे दर्भगवतयुक्त पाणी आणि सर्वौषधी म्हणजे हळद आणि औषधी वनस्पती यांचे मिश्रण लेपन करून स्नान आणि त्यानंतर नदी किंवा सरोवरातील जलाने समंत्र स्नान केले जाते.

असेच स्नान हल्ली निसर्गोपचार आरोग्य केंद्रात केले जाते.

उपाकर्म विधीत स्नानानंतर सूर्योपस्थान म्हणजे सूर्याला अर्घ्य दिले जाते. सूर्य हा सर्वांना ऊर्जा देणारा प्रत्यक्ष दर्शन देणारा देव आहे. जीवनसत्त्व सूर्यकिरणांमधून मिळते हे विज्ञान आज सांगते; ते भारतीय शिक्षण पद्धतीने तेव्हा सिद्ध केले आहे. त्यानंतर आपल्याला ज्यांनी ज्ञान दिले त्या वंदनीय ऋषींचे पूजन केले जाते. ऋषींच्या प्रति कृतज्ञता म्हणून देव आणि ऋषींना तर्पण म्हणजे ऋषी तर्पण केले जाते. पितरांच्या शांतीसाठी पितरांना तिलांजली दिली जाते. या विधीत पापांचे प्रायश्चित्त आणि अंतःकरण शुद्धीसाठी पंचगव्य प्राशन केले जाते. पंचगव्य हे दूध, दही, तूप, गोमूत्र आणि गोमयापासून तयार होणारे आयुर्वेदिक पेय आहे; जे योग्य प्रमाणात प्राशन केले तर पोटातील सर्व विकार आणि आरोग्यासाठी हितकारी असते.

त्यानंतर यज्ञोपवीत परिवर्तन विधी केला जातो. यात गायत्री मंत्राने उपासना प्राणायाम करून केली जाते. नूतन यज्ञोपवीत धारण केले जाते. जीर्ण म्हणजे पूर्वीचे यज्ञोपवीत काढून टाकण्यात येते. त्यानंतर यज्ञनारायणास आहुती म्हणजे हवन केले जाते. यज्ञातील भस्मधारणाने पूजा सांगता करून सर्वांना दही, तीळ, लाह्यांचा प्रसाद दिला जातो. दही आम्ल, शीत आणि तीळ स्निग्ध पदार्थ असल्याने त्याचे एकत्रित सेवनही आरोग्यास उपयुक्त आहे. त्यानंतर वेदाध्ययनास प्रारंभ होतो. गुरुकुल आश्रमात आलेले पालक किंवा जनता यांना लाह्यांचा प्रसाद घरी सर्वांना देण्यासाठी देऊन त्यांना निरोप दिला जातो आणि गुरुकुलातील शिष्य किंवा द्विज अध्ययनाला प्रारंभ करतात.

श्रावणी उपाकर्म करताना विधीतील स्नान कर्म आपल्या शरीराची शुद्धी करतात. सूर्योपस्थान विधी मनःशुद्धीचे कार्य करतात तर ऋषी तर्पण अंतःकरण चतुष्टय शुद्ध करतात.

**स्वाध्यायेन व्रतैर्होमैस्त्रैविद्येनेज्यया सुतैः।**
**महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः॥**

म्हणजे स्वाध्याय, व्रत, होम, त्रैविद्य अध्ययन, यज्ञ आणि महायज्ञ याद्वारे वैदिक अवधारणा उपकर्मात असते. भारतीय ज्ञान परंपरेत आचार्य नेहमीच पंचकोश म्हणजे अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश आणि आनंदमय कोश यांचा विचार करीत असत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये पंचकोश विकासाला प्राधान्य दिले आहे. असो.

**सद्यस्थितीत श्रावणी उपाकर्म विधी कसा करावा ?**

सध्याच्या परिस्थितीत गुरुकुल नाहीत त्यामुळे आपण राखी पौर्णिमेला सकाळी उठून स्नानादी कर्म करून आपल्या घरची पूजा-अर्चा आटोपून नंतर सामूहिकपणे आपल्या गावातील पवित्र नदी, तीर्थ, तळे, सरोवर अथवा मंदिरात श्रावणी विधी तज्ज्ञ आचार्यांच्या मार्गदर्शनात करून- 'अनुकूलस्य संकल्पः प्रतिकूलस्य वर्जनम्।रक्षिष्यतीति विश्वासो गोप्तृत्वे वरणं तथा। आत्मनिक्षेपकार्पण्ये षड्विधा शरणागतिः।।'- हा भाव मनात ठेवावा.

श्रावणी उपाकर्म हा विधी शरीर, मन आणि अंतःकरण शुद्धीचा सुंदर संस्कार आहे. ते अध्यात्म विज्ञान आहे. नव्या पिढीला याचा विसर पडू नये; उलट अशा संस्काराविषयी उत्सुकता वाढली पाहिजे. असे विधी टिकून राहिले पाहिजेत. म्हणून गावातील मंदिर समित्या, धार्मिक, आध्यात्मिक संघटन, संस्थांनी श्रावणी उपाकर्म संस्कार आयोजित करून त्यात सर्वांना सहभागी करून घेतले पाहिजे. ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### भंडारा व महाप्रसादासाठी नवीन नियमांची आवश्यकता आहे काय ?

अन्न व औषध प्रशासनाच्या नवीन नियमानुसार परवानगीशिवाय महाप्रसाद वाटल्यास आयोजकांवर गुन्हा नोंदवणार अशा आशयाचा मजकूर वृत्तपत्रात वाचण्यात आला. हिंदूंच्या कोणत्याही धार्मिक कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने होत असते. त्यामध्ये बहुसंख्य हिंदू तन, मन, धनाने व उत्साहाने भाग घेत असतात. महाप्रसाद किंवा अन्नदानाला भागवतात आणि दत्त संप्रदायात विशेष महत्त्व आहे. याआधीही अन्नातून विषबाधा किंवा जीवित हानी झालेल्या ठिकाणी आयोजकांवर गुन्हे दाखल झाले आहेत. आता हिंदू विचारांचे सरकार असताना अशा प्रकारचा नवीन नियम करून आयोजकांना अडचणीत आणण्याची आवश्यकता नव्हती असे वाटते. काही धार्मिक स्थळांवर नियमित अन्नदान होते व त्यातून कोणताही नफा कमावण्याचा उद्देश नसतो. जेथे व्यावसायिकपणा किंवा नफा कमावणे अशा गोष्टी होतात- जसे उपाहारगृहे, खाद्यपदार्थ विकणारे हातठेले. दिवाळीत आणि इतर सणांना तयार होणारी विषयुक्त मिठाई तसेच युरिया किंवा इतर भेसळयुक्त पदार्थांपासून दूध बनवणाऱ्यांवर कडक कार्यवाही करणे अपेक्षित असताना नियम पाळून धार्मिक कार्यक्रम करणाऱ्या आयोजकांवर गुन्हे नोंदवणे योग्य वाटत नाही. हिंदू धर्मात प्रसाद बनविताना जे दिशानिर्देश दिलेले आहेत, त्याचे पालन होते. त्यामुळे या नवीन नियमांचा पुनर्विचार करून नियम रद्द करावा, ही विनंती.

**शशिकांत दंडे**/नागपूर

■■■

### वाहतूक कोंडी मोठी समस्या

रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही आजच्या शहरी जीवनातील गंभीर समस्या बनली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई, तसेच राज्य आणि राष्ट्रीय महामार्गांवर दिवस-रात्र वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसतात. पूर्वी शनिवार-रविवार किंवा सुटीच्या दिवशी होणारी वाहतूक कोंडी आता रोजचीच बाब झाली आहे. त्यामुळे नागरिकांचा प्रवासाचा वेळ वाढत असून वेळ, इंधन आणि श्रम यांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे.

वाहतूक कोंडीमागे वाहनांची वाढती संख्या हे प्रमुख कारण आहे. दरवर्षी हजारो नव्या वाहनांची भर पडत असताना रस्त्यांची क्षमता मात्र मर्यादित आहे. त्यातच अपुरी पार्किंग व्यवस्था, रस्त्याच्या कडेला होणारे बेशिस्त पार्किंग, अतिक्रमणे आणि वाहतुकीचे अपुरे नियोजन यामुळे समस्या अधिक गंभीर होत आहे. कोंडी कमी करण्यासाठी उड्डाणपूल बांधले जात असले तरी अनेक ठिकाणी त्यावरही वाहनांच्या रांगा लागतात. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने सार्वजनिक वाहतूक, पार्किंग व्यवस्था आणि वाहतूक नियोजन याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक सक्षम करूनच रस्त्यांवरील वाहनांची संख्या आणि वाहतूक कोंडी कमी करता येईल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

■■■

### साखरेचा गोडवा परतणार का ?



भारतात गेल्या महिन्यात साखरेच्या दरात प्रचंड वाढ झालेली आहे. ५० रुपयांत किलोभर मिळणारी साखर ८० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. दिवाळीपर्यंत साखरेचा भाव 'शतक' गाठेल असा अंदाज जाणकारांनी व्यक्त केलेला आहे. रोगराईमुळे आणि बदलत्या हवामानामुळे उसाच्या उत्पादनात घट झाली आहे. सणांचा काळ असल्यामुळे बाजारात साखरेची मागणी अचानक वाढली. पुरवठा कमी आणि वाढलेली मागणी यामुळे साखरेचे दर गगनाला भिडलेले आहेत. ग्राहकांनी आणि दुकानदारांनी आगाऊ खरेदी करून मोठ्या प्रमाणावर साखरेची साठेबाजी केलेली आहे. दरवाढ रोखण्यासाठी सरकारने तब्बल दहा वर्षांनंतर साखर आयातीला मंजुरी दिलेली आहे. साठेबाजांवर ४०० टन साठ्याच्या मर्यादा घातलेल्या आहेत. या उपायांमुळे आगामी सणासुदीच्या काळात साखरेची उपलब्धता वाढेल आणि कडू साखर पुन्हा गोडवा प्राप्त करेल अशी अपेक्षा आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

■■■

### सिलेंडरचा नंबर लावण्याचा कालावधी कमी करावा

पूर्वी सिलेंडरचा नंबर लावण्याचा कालावधी काहीच नव्हता. त्वरित दुसरा नंबर लागत होता. पण इराण युद्धामुळे आता सिलेंडरची पूर्ती झाल्यावर २६ दिवसांनी नंबर लागतो. हा निर्णय नाईलाजाने घ्यावा लागला हेही योग्य होते. पण आता सणासुदीचे दिवस असल्याने सिलेंडरची मागणी वाढणार आहे. २६ दिवसांचा प्रतीक्षा काळ खूप जास्त आहे. तेव्हा सरकारला विनंती की परिस्थिती जर निवळत असेल तर हा प्रतीक्षा काळ कमी करून तो १५ दिवस करावा. पुढील सणांचे दिवस लक्षात घेता सरकार योग्य तो निर्णय घेईल अशी आशा आहे. ■

**चंद्रशेखर खापरे**/९४२३४२०१७१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# ’शेतकरी मेळावा अपडेट

## वीज मंडळ कर्मचारी पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात : सभासदांच्या वैयक्तिक कर्जाची मर्यादा २५ लाखांवर; गुणवंत विद्यार्थी व सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., जिल्हा परभणीची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. ३० ऑगस्ट) स्टेशन रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रसाद सिंगणापूरकर हे होते. सभेमध्ये पतसंस्थेच्या सभासदांच्या हिताच्या दृष्टीने विविध महत्त्वपूर्ण ठराव मांडण्यात आले. त्यामध्ये सभासदांच्या वैयक्तिक कर्जाची मर्यादा २५ लाख रुपये करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव मांडण्यात आला. उपस्थित सभासदांनी या ठरावास मंजुरी दिली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच वीज कंपनीतील सेवानिवृत्त झालेल्या सभासदांचाही सन्मान करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

सभेचे कामकाज खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. अध्यक्ष प्रसाद सिंगणापूरकर यांनी उपस्थित सभासदांचे आभार मानले. सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून पतसंस्थेच्या प्रगतीसाठी भविष्यातही असेच सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर त्यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

## ज्येष्ठ शिक्षक बापुराव बरगे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा : बाल विद्या मंदिर हायस्कूलमध्ये भावपूर्ण निरोप; शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव

**परभणी,/प्रतिनिधी :** बाल विद्या मंदिर हायस्कूलच्या हायस्कूल विभागातील ज्येष्ठ शिक्षक बापुराव विठ्ठलराव बरगे हे नियत वयोमानानुसार ३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेनिमित्त प्रशालेत सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य अरुण बोराडे होते. यावेळी उपमुख्याध्यापक रामदास तुम्मेवार, पर्यवेक्षक तथा वैभवनगर विभागप्रमुख प्रदीप रुघे, पर्यवेक्षक बळीराम कोपरटकर तसेच बरगे यांच्या सुविद्य पत्नी आशा बरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. मुख्याध्यापक तथा प्राचार्य अरुण बोराडे यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बापुराव बरगे यांचा सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी मुंजाजी शेवाळे, डॉ. गजानन जुमडे, प्रवीण सोनोने आणि कु. हर्षदा बरगे यांनी मनोगत व्यक्त करून बापुराव बरगे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव केला. प्रदीर्घ काळ विद्यार्थ्यांना ज्ञानदान करताना त्यांनी जपलेली शिस्त, विद्यार्थ्यांप्रती असलेली आपुलकी आणि सहकाऱ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध यांचा वक्त्यांनी आवर्जून उल्लेख केला.
आशा बरगे यांनी आपल्या मनोगतातून संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सत्कारमूर्ती बापुराव बरगे यांनीही आपल्या प्रदीर्घ सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत संस्थेतील सहकारी, विद्यार्थी आणि सर्व संबंधितांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. सेवाकाळात मिळालेल्या सहकार्यामुळे आपली वाटचाल अधिक समृद्ध झाली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक तथा प्राचार्य अरुण बोराडे यांनी बापुराव बरगे यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा गौरव केला. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, बरगे यांनी आपल्या कार्यातून ती जबाबदारी प्रभावीपणे पार पाडल्याचे त्यांनी नमूद केले. सेवानिवृत्तीनंतरच्या पुढील आयुष्यासाठी त्यांनी बरगे यांना शुभेच्छा दिल्या.
याप्रसंगी बरगे यांचे कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रपरिवार तसेच माजी शिक्षक सुभाष वैरागड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन आणि आभार सुभाष ढगे यांनी मानले. प्रशालेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

## मुख्यमंत्र्यांद्वारे ऑटोमॅटिक स्टीम आयर्न टेबलची पाहणी : भाजपाच्या प्रदेश उद्योग आघाडीचा उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीच्या उद्योग आघाडीने दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातील व्यवसायिकांना वितरित करण्यात येत असलेल्या ऑटोमॅटिक स्टीम आयर्न टेबलची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली.

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश उद्योग आघाडीचे अध्यक्ष प्रमोद वावकोडकर यांच्या माध्यमातून देवाभाऊ रजत समृध्दी योजनेंतर्गत नागपूरातील दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील व्यवसायिकांना व्यवसाय वृध्दीसाठी ऑटोमॅटिक स्टीम आयर्न टेबल वितरित केले जात आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी दक्षिण-पश्चिम नागपूर भाजप जनसंपर्क कार्यालयास भेट देऊन कार्यालयात सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. तसेच देवाभाऊ रजत समृध्दी योजनेंतर्गत धोबी समाजातील २० लाभार्थ्यांना वितरित केलेल्या या अत्याधूनिक आयर्न टेबलची पाहणी केली व या उपक्रमाचे कौतूक केले.

दरम्यान, राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी देवाभाऊ रजत योजना म्हणजे पंडीत दिनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदय संकल्पनेतील एक वाटचाल होय, असे म्हटले.

दरम्यान, वाकोडकर यांनी या अनुषंगाने या मतदारसंघातील अन्य व्यवसायिकांनाही लवकरच या उपक्रमातून व्यवसाय वृध्दीसाठी हे आयर्न टेबल्स उपलब्ध केले जातील, अशी ग्वाही दिली.

## नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिमेतून महिनाभरात १ हजार ७२० गुन्हे : १८ कोटी १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी १ ते ३१ ऑगस्ट या दरम्यान नांदेड परिक्षेत्रात राबविलेल्या अवैध व्यवसाय निर्मूलन मोहिमेतून महिनाभरात नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चार जिल्ह्यात १ हजार ७२० गुन्हे व १८ कोटी १५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

या मोहिमेतून अवैध दारु, गुटखा, मटका, जुगार, अंमली पदार्थ व घातक शस्त्रे इत्यादी विरोधी मोहिम उघडण्यात आली. या मोहिमेतून परभणी जिल्ह्यात महिनाभरात ३२ लाख ६८ हजार २६ रुपये एवढा गुटख्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सहा गुन्ह्यात १८ आरोपींविरोधात कारवाई करण्यात आली. तर मटका व जुगारा संदर्भात १२६ गुन्हे नोंदवून ७६ लाख ९० हजार ४२५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याद्वारे ३५३ आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली. अवैध दारु विरोधात ३३२ गुन्हे दाखल करीत ३७ लाख ५५ हजार ११६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ३३९ आरोपींविरोधात कारवाई करण्यात आली. शस्त्र अधिनियमन या कायद्यांतर्गत जिल्ह्यात तीन गुन्हे दाखल केल्या गेले. चार आरोपींकडून ११ लाख ५४ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# पावसाच्या दिर्घ मोठ्या ब्रेकने सोयाबीन झाले जळून खाक..!

### आभाळाकडे डोळे लावलेल्या शेतकऱ्यांची निराशाच मानवत तालुक्यातील परिस्थिती

**मानवत,/प्रतिनिधी:-** हिरव्यागार सोयाबीनच्या शेतात यंदा भरघोस उत्पादनाची स्वप्न पाहणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर आता करपलेले पीक उभे आहे. सुरुवातीच्या पावसाने साथ दिल्याने चांगली उगवण झालेल्या सोयाबीनला ऐन वाढीच्या आणि शेंगा भरण्याच्या काळात पावसाने पाठ फिरवली. गेल्या महिनाभरापासून समाधानकारक पाऊस न झाल्याने मानवत तालुक्यातील अनेक भागांत सोयाबीनचे पीक अक्षरशः करपून गेले आहे. काही ठिकाणी पाने वाळून गेली, फुलोरा गळून पडला, तर अनेक शेतांमध्ये उभे पीक जळाल्यासारखे दिसत आहे.

यंदा खरीप हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. वेळेवर पाऊस झाल्याने सोयाबीनची पेरणी झाली. महागडी बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत आणि मजुरीवर हजारो रुपये खर्च करून शेतकऱ्यांनी पीक उभे केले. सुरुवातीला पिकाची उगवणही चांगली झाली. शेतात पसरलेली हिरवाई पाहून यंदा उत्पादन चांगले मिळेल, कर्जाचा काही हिस्सा फेडता येईल, घरखर्च भागेल आणि मुलांच्या शिक्षणासाठी पैसे हाताशी राहतील, अशी आशा कागदोपत्री नव्हे, बांधावर जाऊन पंचनामे करा पावसाच्या खंडामुळे झालेल्या नुकसानीची महसूल आणि कृषी विभागाने तातडीने प्रत्यक्ष शेतावर जाऊन पाहणी करावी. करपलेल्या सोयाबीन पिकाचे पंचनामे करून शासनाच्या निकषानुसार नुकसानभरपाई तसेच पीकविम्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



शेतकऱ्यांना वाटत होती. मात्र, निसर्गाने ऐन वेळी दगा दिला. पिकाला पाण्याची सर्वाधिक गरज असताना पावसाने मोठी दडी मारली. जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत गेला आणि सोयाबीनची वाढ खुंटली. फुलोऱ्याच्या आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी हिरवाईने नटलेली शेते आता पिवळी पडलेली आणि करपलेली दिसत आहेत. शेतात उभे पीक हातात घेऊन त्याची अवस्था पाहताना शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी येत आहे. पेरणीपासून आजपर्यंत केलेली मेहनत, त्यासाठी केलेला खर्च आणि घेतलेले कर्ज आठवून काळीज पिळवटून निघत आहे. शेतीसाठी अनेक शेतकऱ्यांनी बँकांकडून कर्ज घेतले आहे. काहींनी व्यापारी, सावकार किंवा परिचितांकडून उधारी करून बियाणे, खते व औषधे खरेदी केली. मशागत आणि मजुरीचा खर्चही मोठ्या प्रमाणात झाला. एवढा खर्च करून उभे केलेले पीकच जर हातातून गेले तर कर्ज फेडायचे कसे, घरखर्च भागवायचा कसा आणि पुढील हंगामाची तयारी करायची कशी, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. पाऊस आणखी काही दिवस लांबला तर उरलेसुरले पीकही हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. उत्पादन होण्याआधीच खर्चाचा डोंगर उभा राहिला असून उत्पन्न मात्र शून्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी पुन्हा एकदा आर्थिक संकट घेऊन येण्याची चिन्हे आहेत. आज शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर करपलेले सोयाबीन आहे, मनात कर्जाचा डोंगर आहे आणि ओठांवर एकच प्रश्न आहे‘‘आता पुढे काय?‘‘ वर्षभराच्या कष्टानंतर हातात चार पैसे येतील, या आशेवर उमे असलेले पीकच जर निसर्गाने हिरावून घेतले, तर शेतकऱ्याने जगायचे कसे? पावसाची आस अजूनही कायम आहे; मात्र आता प्रत्येक दिवस पिकासाठी आणि शेतकऱ्याच्या आशेसाठी निर्णायक ठरत आहे. करपलेल्या सोयाबीन सोबत शेतकऱ्यांची स्वप्नेही करपण्यापूर्वी शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून वस्तुस्थिती जाणून घ्यावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

## हडपसर-पुणे तिसऱ्या रेल्वेमार्गाच्या कामाचा नांदेड विभागातील गाड्यांवर परिणाम

**परभणी,/प्रतिनिधी-** मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील हडपसर-पुणे तिसऱ्या रेल्वेमार्गाच्या कार्यान्वयनासाठी पूर्व-अंतर्गत सिग्नल जोडणी व अंतर्गत सिग्नल जोडणीची कामे करण्यात येणार आहेत. या कामांमुळे नांदेड विभागातून धावणाऱ्या काही गाड्यांच्या परिचालनावर परिणाम होणार असून, काही गाड्या विलंबाने धावणार आहेत. तसेच एका गाडीच्या सुटण्याच्या वेळेत पुनर्नियोजन करण्यात आले आहे.




२ ऑक्टोबर २०२६ रोजी गाडी क्रमांक ११४१० निजामाबाद-पुणे एक्स्प्रेस पटास-उरुळी विभागात सुमारे एक तास ३० मिनिटे उशिराने धावणार आहे. तसेच दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजीही हीच गाडी पटास-उरुळी विभागात सुमारे एक तास ३० मिनिटे नियंत्रित करण्यात येणार आहे. गाडी क्रमांक ११४०६ अमरावती-पुणे एक्स्प्रेस दि. १९ आणि २१ सप्टेंबर २०२६ रोजी दौंड-उरुळी विभागात आवश्यकतेनुसार विलंबाने धावणार आहे. तसेच गाडी क्रमांक १७६१३ पनवेल-नांदेड एक्स्प्रेस दि. २० सप्टेंबर आणि ४ ऑक्टोबर २०२६ रोजी चिंचवड-खडकी विभागात आवश्यकतेनुसार उशिराने धावणार आहे.दरम्यान, गाडी क्रमांक ११४०६ अमरावती-पुणे एक्स्प्रेसच्या दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या सुटण्याच्या वेळेतही बदल करण्यात आला आहे. ही गाडी अमरावती स्थानकावरून नियोजित सायंकाळी ७.५० वाजता सुटण्याऐवजी तीन तास उशिराने रात्री १०.५० वाजता सुटणार आहे. रेल्वे मार्गाच्या कामांमुळे होणाऱ्या या बदलांची प्रवाशांनी नोंद घ्यावी. प्रवास करण्यापूर्वी गाड्यांची अद्ययावत वेळ राष्ट्रीय रेल्वे चौकशी प्रणाली, रेलवन अनुप्रयोग, अधिकृत रेल्वे संकेतस्थळ किंवा हेल्पलाइन क्रमांक १३९ वरून तपासून घ्यावी, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## गट क्रमांक १३६ मधील शेतरस्ता खुला करण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी केले अर्धनग्न आंदोलन

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील केहाळ येथील शेतकऱ्यांनी गट क्रमांक १३६ मधून जाणारा शेतरस्ता खुला करून द्यावा, या प्रमुख मागणीसाठी सोमवारी तहसील कार्यालयात अर्धनग्न आंदोलन केले. शेतकऱ्यांनी थेट तहसीलदार जिंतूर यांच्या केबिनमध्ये ठिय्या देत प्रशासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले.

गट क्रमांक १३६ मधील शेतरस्ता बंद असल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीवर ये-जा करण्यास मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. शेतीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टर, बैलगाडी तसेच इतर शेतीची वाहने शेतापर्यंत नेणे कठीण होत असून, त्यामुळे शेतीच्या कामांवर परिणाम होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. या प्रश्नाबाबत संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करूनही समाधानकारक तोडगा न निघाल्याने अखेर शेतकऱ्यांनी अर्धनग्न आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. तहसीलदारांच्या दालनात आंदोलन करण्यात आल्याने काही काळ तहसील कार्यालय परिसरात प्रशासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले गेले. ‘‘गट क्रमांक १३६ मधील शेतरस्ता तातडीने खुला करून शेतकऱ्यांना



त्यांच्या शेतात जाण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग उपलब्ध करून द्यावा,’’ अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. प्रशासनाने या प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित नोंदी व कागदपत्रांची तपासणी करावी आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. शेतरस्ता हा शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेतीकामासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, रस्ता उपलब्ध नसल्याने पावसाळ्यात आणि शेतीच्या हंगामात अडचणी अधिक वाढतात. त्यामुळे प्रशासनाने केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कार्यवाही करून रस्ता खुला करून द्यावा यासाठी प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी करून सुद्धा गोर गरीब जनतेकडे जिंतूर तहसीलदार चे व मंडळ अधिकारी यांचे जाणून-बुजून दुर्लक्ष झाले आहे या मागणीचे निवेदन व अर्ध नग्न आंदोलन आज सोमवारी दुपारी एकच्या दरम्यान करण्यात आले यावेळी शेतकरी उत्तम गायकवाड माणिक गायकवाड उद्धव गायकवाड बळीराम शेंबडे सर्जेराव शेंबडे विष्णू शेबडे शिवाजी शेंबडे डे दत्ता शेंबडे पंचफुला शेंबडे चंद्रभागा गायकवाड नितागायकवाड सचिन गायकवाड विलास गायकवाड संदीप गायकवाड प्रवीण सरकटे रंगनाथ शेळके शरद चव्हाण संतोष भोरे आदी शेतकऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत

## कास्ट्राईबच्या जिल्हाध्यक्षपदी गायकवाड यांची फेरनिवड

**जिंतूर, /प्रतिनिधी-** पंचायत समिती जिंतूर येथे कक्ष अधिकारी या पदावर कार्यरत असलेले उमेश गायकवाड यांची कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी फिर निवड करण्यात आली आहे संघटनेचे राज्याध्यक्ष माननीय कृष्णा इंगळे व सरचिटणीस सतीश कांबळे यांनी नियुक्तीपत्र दिले

उमेश गायकवाड यांनी यापूर्वीच्या कार्यकाळात परभणी जिल्ह्यात संघटनेचे संघटन मजबूत करण्यासाठी तसेच कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नाबाबत शासन व प्रशासनाकडे पाठपुरावा केला कर्मचारी यांच्या न्याय मागण्या मांडणे कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे या माध्यमातून त्यांनी संघटनात्मक पातळीवर काम केले त्यांच्या कार्याची दखल घेत वरिष्ठ नेतृत्वाने पुन्हा एकदा त्यांच्यावर परभणी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविली आहे कर्मचारी यांच्या प्रश्नासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याचा तसेच जिल्ह्यात संघटनेचे ताकद वाढवण्यासाठी पदाधिकारी यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार गायकवाड यांनी व्यक्त केला त्यांचे निवडीबद्दल मंगेश नरवाडे तसेच पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वागत केले.



## कार पलटी होवून अपघातात सहा जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड-पालम रस्त्यावर रस्त्याच्या खाली उतरलेली कार पलटी होऊन झालेल्या अपघातात सहा जण जखमी झाल्याची घटना रविवार ३० ऑगस्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास वाघलगाव पाटी शिवारात घडली. जखमींपैकी चौघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी परभणी येथे हलविण्यात आले आहे.

रविवारी रात्री ११.४५ ते मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास गंगाखेड येथून मरडसगावमार्गे पालम तालुक्यातील बोरगावकडे कार जात होती. वाघलगाव पाटी शिवारात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्याच्या खाली उतरून पलटी झाली. या अपघातात कारमधील सहा जण जखमी झाले. अपघातानंतर एका जखमीने माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीनिवास मुंडे यांना दूरध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर मुंडे यांनी खासगी रुग्णवाहिका चालक रावण भालेराव यांना अपघाताची माहिती दिली.

## श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर कन्या विद्यालयाचे सुभाष मुळी यांचा ३१ वर्षांच्या सेवेबद्दल गौरव

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर तालुक्यातील श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर कन्या विद्यालयाचे कर्मचारी सुभाष पुरुषोत्तम मुळी यांनी सलग ३१ वर्षे अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यकठोर राहून आपली सेवा यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यांच्या या ३१ वर्षांच्या दीर्घ, प्रेरणादायी आणि निष्कलंक सेवापूर्तीनिमित्त विद्यालयात एका सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

माजी आमदार मा. रामप्रसादजी बोर्डीकर आणि संस्थेच्या अध्यक्षा सौ. मीनाताई बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी कन्या विद्यालयातील आपली सेवा पूर्ण केली. या सेवापूर्ती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक उमेश कोरडे हे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रभाकर अभुरे उपस्थित होते. तसेच मंचावर प्राचार्य कैलास मुटकुळे, मुख्याध्यापक राजू वाकळे, मुख्याध्यापक शिवाजी भोंडवे, अलका वसमतकर, प्राचार्य खंडेराव भिसे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी सुभाष मुळी यांच्या ३१ वर्षांच्या सेवाकाळातील सचोटी, कामावरील निष्ठा



आणि वेळेचे भान याबद्दल गौरवोद्गार काढले. तसेच बोर्डीकर परिवाराच्या मार्गदर्शनाखाली उभ्या राहिलेल्या शिक्षण संस्थांच्या उभारणीत आणि वाटचालीत त्यांनी दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे मनोगतात व्यक्त केले. कार्यालयातील प्रत्येक सहकाऱ्यासाठी मार्गदर्शक ठरलेल्या या सत्कारमूर्तींचा सत्कार पाहून उपस्थितांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष घाटूळ यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय जोशी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वंदना काळजाते, विजय देशमुख, सखाराम घवले, प्रशांत देशमुख, अंकुश पिंपळकर, सुबोध मते, किरण मते, अनिल मेटांगळे, गोविंद काटे यांसह आदी कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले व सहकार्य केले.

# पत्रकारांच्या अडी-अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करणार

## विभागीय उपसंचालक सुनील कच्छवे यांचे आश्वासन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

पत्रकारांना शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सुविधा, योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करण्यात येईल. पत्रकारांच्या अडी-अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन विभागीय उपसंचालक सुनील कच्छवे यांनी दिले.

लातूर विभागीय उपसंचालक सुनील कच्छवे यांनी हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्ह्यातील मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या अडी-अडचणी जाणून घेतल्या. पत्रकारांना शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध सुविधा व योजनांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित 'पत्रकारांशी संवाद' कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता बोलत होते. यावेळी लातूर विभागाचे विभागीय उपसंचालक सुनील कच्छवे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, उपसंपादक अलका पाटील तसेच हिंगोली जिल्ह्यातील मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता म्हणाले की, मतदार यादी ही लोकशाही प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक आहे. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांनी आपले नाव, पत्ता व इतर तपशील तपासून घ्यावेत. नावामध्ये दुरुस्ती आवश्यक असल्यास किंवा पात्र असूनही नाव यादीत नसल्यास संबंधित बीएलओशी संपर्क साधून आवश्यक ती कार्यवाही करावी. मतदारांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करून घ्यावी, असे त्यांनी सांगितले. तसेच कॉर्पोरेट सामाजिक दायित्व निधीतून जिल्ह्यातील तीन गावांमध्ये वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी संबंधित कंपनीला काम देण्यात आले आहे. या वर्गखोल्यांचे बांधकाम सीबीएसई पॅटर्ननुसार करण्यात येत असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी पत्रकारांसाठी असलेल्या अधिस्वीकृती पत्रिका, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी आणि सन्मान योजना याबाबत सविस्तर माहिती दिली. शासनाच्या विविध योजना, निर्णय आणि उपक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यामध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वाची असून, शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा म्हणून पत्रकारिता प्रभावीपणे कार्य करते, असे त्यांनी नमूद केले.

विभागीय उपसंचालक सुनील कच्छवे यांनी जिल्हा माहिती कार्यालयास भेट देऊन कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून विविध कामकाजाची माहिती घेतली. यावेळी प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, उपसंपादक अलका पाटील, वरिष्ठ लिपिक विशाखा शेंडगे, लिपिक श्रीकांत देशमुख, मनोहर भारती, मानसी राऊत आदी उपस्थित होते.

# हिंगोलीत राष्ट्रसंत भगवान बाबा यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान व भाविक भक्त मंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत भगवान बाबा यांची जयंती उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. हिंगोली शहरातील जिनमाता नगर येथील गणपती मंदिरासमोर श्रावण कृष्ण चतुर्थी या तिथी ला१ सप्टेंबर २०२६ मंगळवार रोजी हा कार्यक्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमास महिला भगिनी तसेच पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सारंगधर गीते यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जीवनकार्यावर व समाजप्रबोधनाच्या कार्यावर सविस्तर विचार व्यक्त केले. भगवान बाबांनी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता यांविरुद्ध जनजागृती करून समाजाला एकोपा, सदाचार, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीची दिशा दिली. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श घेऊन समाजाने एकजूट होऊन पुढील पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

संत भगवान बाबांच्या विचारांमध्ये मानवसेवा, सामाजिक समता, शिक्षण, व्यसनमुक्ती, स्वच्छता आणि समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकास साधण्याचा संदेश असल्याचे यावेळी अध्यक्षीय समारोपात सांगण्यात आले. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन सामाजिक व विधायक उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाल बांगर यांनी केले तर आभार राजकुमार मोरगे यांनी मानले.

या जयंती कार्यक्रमास गोकर्ण कुटे,कान्होपात्रा चव्हाण,रुक्मिणा जायभाये,रत्नमाला आहेर, मीना येरावार, रत्नमाला सोळंके, चंपावती घोंगडे, विजयाताई, विजया देशमुख, विमलादेवी अल्लुरी मेजर पंढरीनाथ घुगे, गोपाल बांगर, प्रा. सुधीर वाघ, डॉ. भीमराव मुंडे, शुभम घुगे, गणेश मिसाळ, सारंगधर गीते, राहुल घुगे, संदीप वाघ, दत्तराव कुटे, बंटी उर्फ प्रजन्य बांगर, राजकुमार मोरगे, यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, भाविक भक्त व परिसरातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या पदाधिकारी यांनी पुढाकार घेतला.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला खरीप हंगाम पीक नोंदणीचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात खरीप हंगामातील पीक नोंदणीच्या कामकाजासह महसूल, कृषी, भूसंपादन विभागाशी संबंधित विविध विषयांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोदवड, उपजिल्हाधिकारी (महसूल) अनिल माचेवाड, भूसंपादन उपजिल्हाधिकारी मंजूषा मुथा, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत वनपट्टेधारकांसाठी स्वतंत्र गाव नमुना क्रमांक ७ ई/१२ ई तयार करण्याच्या कामकाजाचा, शेतकरी ओळख क्रमांक नोंदणीच्या प्रगतीचा तसेच वनहक्कधारकांना प्रदान करण्यात आलेल्या कम्पार्टमेंटमधील पट्ट्याच्या आधारे गाव नमुना क्रमांक सातबारा तयार करण्याच्या कामकाजाचा तालुकानिहाय सविस्तर आढावा घेतला.

तसेच शासकीय जमिनींचे ऋऑंपव ढऑंहिळपस करून त्यांची डरपव इरपज्ञ मध्ये नोंद करण्याबाबत आणि जमीन खरेदी-विक्री व्यवहारातील अनियमितता तपासणीसाठी गठीत समितीने सुचविलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या सनियंत्रण पोर्टलच्या वापराबाबत यावेळी माहिती देण्यात आली. या योजनेअंतर्गत तातडीने देण्यात आलेली कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांना दिल्या. ज्या सर्व्हे क्रमांकासाठी सातबारा व मिळकत पत्रिका अशा स्वरूपात दुहेरी अधिकार अभिलेख सुरू आहेत, त्या सर्व्हे क्रमांकांचा सातबारा बंद करण्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १२२ अन्वये करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पीक कापणी प्रयोगाच्या नोंदणीच्या कामकाजाचा आढावा घेऊन पीक कापणी प्रयोगांची नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.




**हिंगोली- महालक्ष्मीचा सण आता अवघ्या काही दिवसांवर आला आहे. यानिमित्त हिंगोलीच्या बाजारपेठेत सुंदर व सुबक महालक्ष्मीचे मुखवटे, आकर्षक मखर आणि इतर साहित्य विक्रीसाठी आले असून नागरिक साहित्य खरेदीसाठी मोठी गर्दी करीत असतांना दिसत आहेत. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### घरकुलाच्या अनुदानासाठी लाभार्थ्यांचे हेलपाटे



हिंगोली- सेनगाव पंचायत समितीमध्ये घरकुलाच्या अनुदानासाठी लाभार्थी चकरा मारीत आहेत. ग्रामीण भागातून आशेने येणाऱ्या लाभार्थ्यांना पंचायत समितीमध्ये आल्यानंतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे तीव्र संताप व्यक्त होत आहे. खडकी येथील खुशालराव नामदेवराव हराळ व शालीकराम हराळ हे मागील अनेक दिवसांपासून पंचायत समितीमध्ये घरकुलाच्या अनुदानासाठी चकरा मारीत आहेत परंतु त्यांना अधिकारी व कर्मचारी दाद देत नाहीत. तसेच पंचायत समितीमध्ये दलालांचा सुळसुळाट झाल्यामुळे गोरगरीत लाभार्थ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे त्यांनी तरूण भारतशी बोलतांना सांगितले.

### महारेलच्या कामामुळे दोन दिवस निर्जळी

हिंगोली- महामार्गाच्या माध्यमातून हिंगोली शहरात जलपुरवठा वाहिनी/जलपुरवठा प्रणालीच्या क्षेत्रात पाईपलाईनचे आवश्यक काम केले जाणार आहे. या कामामुळे हिंगोली शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था प्रभावित होणार आहे. शहरातील पाणीपुरवठा दोन दिवस दिनांक ०२/०९/२०२६ आणि ०३/०९/२०२६* रोजी बंद राहील. त्यामुळे, हिंगोली शहरातील सर्व नागरिकांनी सदर कालावधीपूर्वी आपल्या गरजेनुसार पुरेसे पाणी साठवून ठेवावे आणि पाण्याचा जपून वापर करावा. महा रेल्वेचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा व्यवस्था पूर्ववत केली जाईल. मात्र, कामाच्या स्वरूपानुसार पाणीपुरवठ्यात काहीसा विलंब होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी याची नोंद घ्यावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

### बैलपोळा निमित्त बाजार सजला



हिंगोली- अवघ्या काही दिवसांवर बैल पोळा हा सण आला असून यानिमित्त हिंगोलीच्या बाजारपेठेत पोळ्या निमित्त बैलांना सजविण्यासाठी झुली, घुंगराच्या विविध प्रकारच्या माळा, वादीचे वेसन याशिवाय रंग, छापे आदी वस्तू बाजारात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर आल्या आहेत. बळीराजा बैलांना सजविण्यासाठी विविध वस्तू खरेदी करतांना दिसत आहेत.



**हिंगोली- येथील शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारा २०० मिली टेट्रा पॅकचा निर्णय रद्द करावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे भीमशक्तीच्यावतीने करण्यात आली. छाया- सुनील पाठक**

# औंढा नागनाथ तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने औंढा नागनाथ तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करा व विविध मागण्या यासंदर्भाचे औंढा नागनाथ तहसील कार्यालयात औंढा तहसीलदार हरीश गाडे यांना बुधवार (ता.०२) रोजी दुपारी तीन वाजता निवेदन दिले.

निवेदनात औंढा नागनाथ तालुक्यामध्ये जवळपास मागील ४० दिवसांपासुन पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची पिके उभी वाळुन गेली आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे स्वतंत्र यंत्रणेने ताबडतोब वैयक्तीक पंचनामे करुन तसा अहवाल शासनाकडे सादर करावा. तसेच हळद या पिकासाठी ट्रिगर पध्दत लागु असल्याने मागील पावसाचा प्रदीर्घ खंड पाहता शेतकऱ्यांच्या खात्यावर हळद पिक विमा तसेच ईतर पिक विम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, आणि शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान ताबडतोब वितरीत करावे. औंढा नागनाथ तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करावा .पीक नुकसानीचे स्वतंत्र यंत्रणेने ताबडतोब पंचनामे करावेत. पावसाचा दीर्घ खंड पडल्याने शेतकऱ्यांच्या खात्यावर २५ टक्के अग्रीम पिक विमा ताबडतोब जमा करण्यात यावा. कर्जमाफीस पात्र शेतकऱ्यांना ताबडतोब पुन्हा पीक कर्ज वाटप करावे. शेतकरी कर्जमाफीसंदर्भात जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून तातडीने प्रक्रिया सुरू करावी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रोत्साहनपर अनुदान ताबडतोब खात्यावर जमा करावे, तसेच घरकुल योजनेचे थकीत हप्ते लाभार्थ्यांना द्यावेत, आदी मागण्यांसाठी आता आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता औंढा नागनाथ बसस्थानकापासून तहसील कार्यालयापर्यंत ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात येणार आहे.

शेतकरी विविध आर्थिक अडचणींचा सामना करीत असताना कर्जमाफीची प्रक्रिया तातडीने सुरू होणे आवश्यक आहे. नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेले प्रोत्साहनपर अनुदान अद्याप मिळाले नसल्याने ते तातडीने खात्यावर जमा करावे. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे रखडलेले हप्तेही तत्काळ वितरित करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच विविध शासकीय व निमशासकीय नोकरभरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी आणि पात्र उमेदवारांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा; अन्यथा शेतकरी व कार्यकर्ते ट्रॅक्टरसह रस्त्यावर उतरतील, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर शिवसेना उबाठा पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बालनाट्य व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने १६ नोव्हेंबर, २०२६ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी दिली. हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त नाटय संस्थांनी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे खेडेकर यांनी नमूद केले आहे.

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२६ पासून विविध १० केंद्रांवर तर ६५ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिमफेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२६ पासून आयोजित करण्यात येणार आहे.नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाटय स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेशिका २५ सप्टेंबर, २०२६ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशील भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही. स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धे करीता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल, असेही संचालनालयाने कळविले आहे.

# दराडे विद्यालयाच्या कबीर गोवंदेला दुहेरी सुवर्णपदक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ सप्टेंबर**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी कबीर सिद्धार्थ गोवंदे याने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित द्वितीय इंटरनॅशनल कराटे व काता स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत दोन सुवर्णपदके पटकावली.

कबीरने कराटे तसेच काता या दोन्ही प्रकारांत उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करून सुवर्णपदक मिळविले. त्याच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र कराटे असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांनी केले होते.

या यशाबद्दल विद्यालयात कबीर सिद्धार्थ गोवंदे याचा विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार तसेच शिक्षक, शिक्षिका व कर्मचारीवृंद यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. शाळेतील क्रीडा अध्यापक अनिल लोळेवार यांनी कबीरला मार्गदर्शन केले.यावेळी त्याचे अभिनंदन करून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर व सचिव ॲड. गयबाराव नाईक यांनी कबीर आणि मार्गदर्शक अध्यापकांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. कबीरच्या या यशाबद्दल त्याचे पालक, क्रीडा मार्गदर्शक आणि विद्यालयातील शिक्षकवृंद यांचेही अभिनंदन होत आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत
# कृषी
गुरूवार, दि. ०३ सप्टेंबर २०२६


**शेंडे आणि फळे पोखरणारी अळी फिकट गुलाबी रंगाची असून प्रामुख्याने वांगी पिकावर आढळते. पतंगाचा आकार मध्यम असून, पहिल्या दोन पंखावर विटकरी काळसर चट्टे असतात. मादी पतंग कोवळ्या शेंड्यावर, फुलांवर आणि फळांवर २०० - २५० अंडी घालते. अंड्यातून पांढरट अळी बाहेर पडते. पूर्ण वाढ झालेली अळी फिकट गुलाबी रंगाची दिसते.**

कृषी व्यवस्थापन

# वांगी पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापन

भाजीपाला पिके हे आर्थिकदृष्ट्या अधिक महत्त्वाचे आहे. कारण या पिकांच्या उत्पन्नामुळे, बाजारपेठेतील उलाढालीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत भर पडते. त्याचप्रमाणे आहारातही भाजीपाल्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाजीपाल्यामध्ये प्रामुख्याने वांग्याची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. परंतु त्यावर किडींचा प्रादुर्भाव देखील अधिक होतो. त्याकरिता वांगी पिकावरील किडींचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

**१) शेंडे आणि फळे पोखरणारी अळी** : ही अळी फिकट गुलाबी रंगाची असून प्रामुख्याने वांगी पिकावर आढळते.




पतंगाचा आकार मध्यम असून, पहिल्या दोन पंखावर विटकरी काळसर चट्टे असतात. मादी पतंग कोवळ्या शेंड्यावर, फुलांवर आणि फळांवर २०० - २५० अंडी घालते. अंड्यातून पांढरट अळी बाहेर पडते. पूर्ण वाढ झालेली अळी फिकट गुलाबी रंगाची दिसते. नंतर ती ७-१० दिवसांसाठी कोश अवस्थेत जाते. या अळीचा प्रादुर्भाव जास्त असल्यास ५० टक्के शेंड्यांचे नुकसान होऊ शकते. ह्या अळ्या फळातील गर खातात, अशी फळे निरुपयोगी ठरतात. या किडींचा प्रादुर्भाव जानेवारीपासून वाढू लागतो आणि ऑक्टोबर महिन्यांपर्यंत चालतो. म्हणजे साधारणता १० महिने या अडीचा प्रादुर्भाव दिसून येतो. या अळीमुळे फळांचे ३० - ४० टक्के नुकसान होते.

**२) पांढरीमाशी** : पांढरीमाशीचे पिले व प्रौढ प्रामुख्याने पानाच्या खालच्या बाजूस असतात. पिले साधारण पिवळसर रंगाची दिसतात. ते पानातील रस शोषतात त्यामुळे झाडांची पाने पिवळी पडतात व आपल्या शरीरातून चिकट पदार्थ सोडतात. पानांवर काळ्या बुरशीची वाढ होते आणि झाडांची वाढ खुंटते, पर्यायाने उत्पादनात घट होते. ही मादी साधारणपणे दिवसाला १०० अंडी



झाडाच्या पानांच्या खालच्या बाजूने घालते. अंड्यातून बाहेर पडलेल्या पिलांची वाढ होण्यास ९ - १४ दिवस लागतात. त्यानंतर ती कोश अवस्थेत जाते. या माशीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने कोरड्या हवामानात जास्त होतो.

**३) तुडतुडे** : पिले आणि प्रौढ पानातील रस शोषून घेतात व पानांच्या



कडावरील बाजूस वाढतात आणि त्यानंतर कडा करपून जातात. या किडीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने कोरडे हवामानात होतो तसेच यामुळे झाडाची पाने देखील पिवळी पडतात. पूर्णगुच्छ या विषाणूजन्य रोगाचा प्रसार तुडतुड्यांमार्फत होतो. याची मादी पानांच्या आत शिरते व अंडी घालते. अंड्यातून पिल्लांना बाहेर येण्यास ६ - १० दिवस लागतात. या पिलांची पूर्ण वाढ होण्यास १४ - १७ दिवस लागतात. त्यांचा रंग फिकट हिरवा असतो.

**वांग्यातील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन**

१) वांग्यावरील किडीचे नियंत्रण करण्यासाठी पीक लागवडीपूर्वी शेताची खोलवर नांगरणी करून घ्यावी. तसेच त्या शेतात अगोदर जर टोमॅटो, भेंडी, पालेभाज्या, कडधान्य लावली असतील, तर तिथे वांगी पिकाची लागवड करू नये. त्यामुळे किडीची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता असते.

२) शेंडे पोखरणाऱ्या अळीमुळे शेंडे किडलेले आढळल्यास, असे शेंडे हाताने खुडून काढावेत व खोल खड्ड्यात पुरून नष्ट करावेत.

३) पूर्ण लागवड झाल्यानंतर दोन महिन्यांनी व त्यानंतर झाडांना फळे व फुले येऊ लागतात. त्यात जर किडीचा प्रादुर्भाव दिसला तर ते वेळीच तोडून बाजूला करावी.

४) रोपांची पूर्ण लागवड करताना पूर्णलागवडीपूर्वी रोपांचा पानाकडील भाग १ लिटर पाण्यात ३० मिलि निंबोळी तेल किंवा इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली व मुळाकडील भाग ट्रायकोडर्मा विरिडी ४ मिलि प्रती १ लिटर पाण्यात बुडवून एक तास ठेवावेत. नंतर त्याचा वापर लागवडीसाठी करावा.

५) वरील किडींचे रासायनिकदृष्ट्या व्यवस्थापनाकरिता खालील किटकनाशकांची फवारणी करावी.

**ब्रोप्लानीलीड २० टक्के प्रवाही** - २.५ मिली किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही - १३ मिली / १० लि. पाणी (शेंडे आणि फळे पोखरणारी अळी, तुडतुडे)

**स्पीनोसॅड ४५ टक्के एस सी**- ३.५ मिली किंवा क्लोरॅनेट्रानिलिप्रोल १८.५ टक्के एस सी - ४ मिली / १० लि. पाणी (शेंडे आणि फळे पोखरणारी अळी)

इमामेक्टीन बेन्झोऐट १.५० टक्के + डॉयफेनथियुरॉन ३० टक्के एस सी - २० मिली / १० लि. पाणी (शेंडे आणि फळे पोखरणारी अळी, तुडतुडे, पांढरीमाशी)

●●●

**- डॉ. सोनल नागे**
**- डॉ. योगेश चर्जन,**
**- डॉ. राजेंद्र वानखडे**
कृषी संशोधन केंद्र, अचलपूर (डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला)

# यंदा पावसाची लवकरच माघार

कृषी हवामान

सुस्पष्ट कमी दाबाचे क्षेत्र सध्या गंगा नदीच्या खोऱ्यातील पश्चिम बंगाल आणि उत्तर किनारी ओडिशाचा लगतचा भाग व वायव्य बंगालच्या उपसागरावर स्थित आहे. ते पश्चिम-वायव्य दिशेने सरकण्याची शक्यता आहे. २४ तासांत ते उत्तर ओडिशा आणि गंगा खोऱ्यातील पश्चिम बंगालमधून प्रवास करण्याची शक्यता आहे.

**मान्सून द्रोणी** : सुस्पष्ट कमी दाबाच्या क्षेत्राचे केंद्र थेट मान्सून द्रोणीला जोडलेले असते, जी अमृतसर, पतियाळा, नजीबाबाद, बस्तीमधून जाते आणि आग्नेय दिशेकडे पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात विस्तारते.

**द्रोणी (ट्रफ)** : एक वेगळी हवामान द्रोणी दक्षिण गुजरातपासून उत्तर मध्य महाराष्ट्र आणि छत्तीसगड ओलांडून, समुद्र सपाटीपासून सरासरी ५.८ किमी उंचीपर्यंत पसरते आणि या चक्रीय वाऱ्यांच्या प्रवाहाशी जोडली जाते.

वरील सर्व हवामान प्रणालीचा परिणाम म्हणून या आठवड्यात विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्रामध्ये चांगल्या पावसाला अनुकूल परिस्थिती तर पश्चिम महाराष्ट आणि मराठवाडा विखूरलेल्या परिस्थितीमध्ये शक्यता आहे.

राजस्थानमधून यंदा परतीचे मान्सून वारे ५ ते १० सप्टेंबर दरम्यान माघारी फिरू शकतात.

●●●

**- अभिषेक खेरडे,**
हवामान अभ्यासक, अचलपूर

कृषी वार्ता

# जमीन, पीक आणि शेतकरी माहितीशी जोडली जाणार खतखरेदी



देशातील खतवितरण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि गरजाधारित करण्यासाठी केंद्र सरकारने इंटीग्रेडेड फर्टीलायझर मॅनेजमेंट सिस्टीममध्ये मोठा बदल करण्यास सुरुवात केली आहे. आता खतविक्रीची माहिती थेट शेतकरी, त्याची जमीन आणि लागवड केलेल्या पिकांच्या डेटाशी जोडण्याची प्रक्रिया केली जाणार आहे. महाराष्ट्रासारख्या मोठ्या खतवापराच्या राज्यासाठी या बदलाचे विशेष महत्त्व आहे.

केंद्राच्या नव्या व्यवस्थेनुसार शेतकऱ्याने खताची मागणी करताना अॅग्रीस्टॅक आधारित ओळखीद्वारे नोंदणी करणे अपेक्षित आहे. जमीन आणि मालकीची माहिती पडताळल्यानंतर खतासाठी नोंदणी करता येईल. त्यानंतर तयार होणाऱ्या क्युआर कोडच्या माध्यमातून किरकोळ विक्रेत्याच्या पीओएस मशीनवर प्रत्यक्ष खरेदीची नोंद केली जाईल. यामुळे कोणत्या शेतकऱ्याने, किती क्षेत्रासाठी आणि कोणत्या पिकासाठी किती खत घेतले, याचा अधिक अचूक डिजिटल मागोवा घेता येणार आहे.

**महाराष्ट्रासाठी का महत्त्वाचे?**

महाराष्ट्र हे देशातील खतवापर करणाऱ्या प्रमुख राज्यांपैकी एक असून, यापूर्वीच राज्य सरकारने खरीप हंगामात खतविक्रीचे प्रमाण शेतकऱ्यांच्या जमीनधारणा आणि पेरणीच्या क्षेत्रानुसार ठरविण्याच्या शक्यतेवर चर्चा केली होती. खतांच्या उपलब्धतेतील तफावत, साठेबाजी आणि अनियमित वितरणाला आळा घालण्यासाठी डिजिटल पद्धतीचा वापर करण्यावर राज्याने भर दिला आहे.

महाराष्ट्रात सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा, ऊस, कांदा, फळबागा अशा विविध पिकांचे क्षेत्र मोठे आहे. त्यामुळे एकाच प्रकारच्या खताची मागणी सर्व भागांत सारखी नसते. विदर्भातील कापूस-सोयाबीन पट्टा, मराठवाड्यातील सोयाबीन-तूर क्षेत्र, पश्चिम महाराष्ट्रातील ऊस पट्टा आणि नाशिक-पुणे भागातील भाजीपाला व फळपिके यांच्यासाठी खतांची गरज वेगवेगळी असते. पीकनिहाय डिजिटल माहिती उपलब्ध झाल्यास खतपुरवठ्याचे अधिक अचूक नियोजन करण्यास मदत होऊ शकते.

**‘जितकी जमीन, तितके खत’ या पलीकडे जाण्याची गरज**

या प्रणालीचा उद्देश केवळ खताचे प्रमाण मर्यादित करणे नसून गरजेनुसार खत उपलब्ध करून देणे हा आहे. उदाहरणार्थ, एका हेक्टर कापूस पिकाची आणि एका हेक्टर ऊस पिकाची पोषण गरज समान नसते. तसेच मातीची सुपीकता, सिंचनाची उपलब्धता, पिकाची अवस्था आणि आधीचा खतवापर यानुसारही गरज बदलते. म्हणून भविष्यात महाराष्ट्रात मृदा आरोग्य पत्रिका, पीकनिहाय शिफारस, पेरणीचा डेटा आणि खतखरेदीचा इतिहास यांचा एकत्रित वापर केला तर अधिक अचूक आणि संतुलित खत व्यवस्थापन शक्य होऊ शकते.

**साठेबाजी आणि काळाबाजारावर नियंत्रणाची शक्यता**

आयएफएमएसमध्ये उत्पादन, आयात, वाहतूक, साठा, किरकोळ विक्री आणि अनुदान प्रक्रिया यासारख्या टप्प्यांची माहिती जोडली जात आहे.

खत वाहतुकीवर ट्रेकींग सिस्टमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्याची व्यवस्थाही मजबूत केली जात आहे. त्यामुळे खताचा साठा कुठे आहे, कोणत्या भागात पुरवठा कमी आहे आणि वाहतुकीत विलंब कुठे होत आहे, याचा अधिक वेगाने मागोवा घेता येईल.

सध्या या डिजिटल व्यवस्थेशी १४ कोटींपेक्षा अधिक आधार लिंक खरेदीदार, २.५ लाखांहून अधिक किरकोळ विक्रेते आणि वर्षाला सुमारे ७ कोटी मेट्रिक टन खत व्यवहार जोडलेले असल्याचे केंद्राने सांगितले आहे. खत अनुदानाच्या मोठ्या आर्थिक व्यवस्थेवरही या प्रणालीचा परिणाम होणार आहे.

**पारदर्शकता वाढणार, पण डेटा अचूक असणे आवश्यक**

डिजिटल खतव्यवस्थेमुळे शेतकर्यांना योग्य वेळी योग्य प्रमाणात खत उपलब्ध होण्यास मदत होऊ शकते. मात्र, महाराष्ट्रात ७/१२ उतारा, पीकपेरा, भाडेतत्त्वावरील शेती, संयुक्त मालकी आणि प्रत्यक्ष लागवड क्षेत्र यांसारख्या बाबींची माहिती अद्ययावत ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

कारण डिजिटल नोंदीत जमीन किंवा पीक माहिती चुकीची असल्यास खतखरेदीच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रणाली लागू करताना शेतकर्यांना सुलभ दुरुस्ती व्यवस्था, स्थानिक पातळीवर मदत आणि ऑफलाइन पर्याय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

एकंदरीत, खतखरेदीला शेतकरी-जमीन-पीक डेटाशी जोडण्याचा निर्णय हा महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रासाठी डिजिटल आणि डेटा-आधारित खत व्यवस्थापनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल. मात्र, या व्यवस्थेतून शेतकऱ्याला गरजेच्या वेळी योग्य खत योग्य प्रमाणात उपलब्ध व्हावे तरच ही व्यवस्था यशस्वी ठरली असे म्हणता येईल.

●●●

कृषी यशोगाथा

# सेंद्रिय करटुले शेतीचा यशस्वी प्रयोग


## केळापूर येथील शेतकऱ्याची यशोगाथा

वर्धा जिल्ह्यातील केळापूर गावचे प्रयोगशील शेतकरी अशोकसिंह धुमाळे यांनी नैसर्गिक साधनांचा योग्य वापर आणि सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करून भाजीपाला क्षेत्रात करटूले शेतीचा यशस्वी प्रयोग केला आहे. त्यांनी १० गुंठे क्षेत्रात ४० हजार रुपयाचे निव्वळ उत्पादन घेतले.

अशोकसिंह धुमाळे यांनी मे २०२५ मध्ये अवघ्या १० गुंठे क्षेत्रात सेंद्रिय पद्धतीने करटुले पिकाची लागवड केली होती. त्यावेळी त्यांनी जंगलातून करटुल्याचे कंद व बियाणे गोळा करून स्वतः बियाणे तयार केले. लागवडी दरम्यान नर व मादी झाडांचे योग्य प्रमाण राखण्यासाठी दर १० मादी झाडांनंतर १ नर झाडाची शास्त्रीय पद्धतीने लागवड केली. पहिल्या वर्षी लागवडीनंतर अवघ्या दीड महिन्यात फळधारणा सुरू झाली. त्यामधून आठवड्यातून २ वेळा तोडा करून प्रति तोडा ४ ते ५ किलो फळे मिळाली. बाजारात करटुल्याला २०० ते २५० रुपये प्रति किलोचा दर मिळाला व पहिल्याच वर्षी १० गुंठ्यातून त्यांनी ४० हजाराचे निव्वळ उत्पादन घेतले.

पहिल्या वर्षाच्या यशानंतर अशोकसिंह यांनी यावर्षी १ एकर क्षेत्रावर लागवड केली. गत वर्षी स्वतः तयार केलेले ३ ते ३.५ किलो बियाणे मे महिन्यात पेरले. ऑगस्ट महिन्यात पहिला तोडा ८ किलो तर दुसरा तोडा १०





किलो पर्यंत झाला असून, ऑक्टोबरपर्यंत दर आठवड्याला २ तोडे निघतील असा अंदाज आहे. यामध्ये २०० ते २५० रुपये प्रति किलो बाजारभाव मिळत असून करटुल्याची विक्री ते थेट बाजारात करीत आहेत.

अशोकसिंह सेंद्रिय पीक संरक्षण पद्धतीचा अवलंब करतात. त्यांनी लागवडीपूर्वी बियाण्यांवर ट्रायकोडेर्माची बीज प्रक्रिया केली. कीड नियंत्रणाकरिता पीक लागवडीनंतर पिकाच्या लहान अवस्थेत दर १०-१० दिवसांनी निमार्कच्या २ फवारण्या दिल्या. तसेच फळमाशी प्रादुर्भावापासून रक्षण करण्यासाठी फेरोमोन ट्रॅपचा यशस्वी वापर केला. अशोकसिंह धुमाळे यांच्या या नावीन्यपूर्ण करटुले शेती प्रयोगाला कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.जीवन कतोरे, विषयतज्ञ डॉ. भारती तिजारे, डॉ. निलेश वझीरे, डॉ. अंकिता अंगाईतकर आणि डॉ.सचिन मुळे यांनी प्रत्यक्ष भेट दिली. भेटीदरम्यान तज्ज्ञांनी पिकाची पाहणी करून शास्त्रोक्त पद्धतीचा अवलंब करून अधिक उत्पन्न कसे घ्यावे, याविषयी मार्गदर्शन केले.

अशोकसिंह धुमाळे यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीने, जंगलातील नैसर्गिक वनस्पतींचे संवर्धन करून सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून कमी खर्चात व कमी वेळेत भरघोस उत्पन्न मिळवून इतर शेतकऱ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

●●●

कृषी तंत्रज्ञान

# ट्रायकोकार्ड : कीड व्यवस्थापनातील जैविक क्रांती

भारतीय शेतीमध्ये किडींच्या नियंत्रणासाठी अनेक वर्षांपासून रासायनिक कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. सुरुवातीला ही कीटकनाशके प्रभावी ठरली; मात्र त्यांच्या सतत आणि अतिरेकी वापरामुळे किडींमध्ये प्रतिकारशक्ती निर्माण झाली, मित्रकीटकांचा नाश झाला, उत्पादन खर्च वाढला आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम दिसू लागले. त्यामुळे आज शाश्वत शेतीसाठी जैविक कीड व्यवस्थापनाचा स्वीकार करणे अत्यंत आवश्यक आहे. या जैविक उपायांमध्ये ट्रायकोकार्ड हे सर्वाधिक प्रभावी आणि शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध तंत्रज्ञान मानले जाते.


**ट्रायकोकार्ड म्हणजे काय?**

ट्रायकोकार्ड हे रासायनिक कीटकनाशक नसून ट्रायकोग्रामा या सूक्ष्म परजीवी मित्रकीटकाची परजीवीकृत अंडी असलेले विशेष कार्ड आहे. हा मित्रकीटक पिकांचे नुकसान करणाऱ्या पतंगवर्गीय किडींच्या अंड्यांमध्ये परजीवीकरण करतो. त्यामुळे अळी जन्माला येत नाही आणि किडीचे जीवनचक्र सुरुवातीलाच थांबते.

**ट्रायकोकार्ड कसे कार्य करते?**

शेतात ट्रायकोकार्ड लावल्यानंतर १ ते ३ दिवसांत त्यामधून हजारो ट्रायकोग्रामा बाहेर पडतात. हे मित्रकीटक पिकांवर विखुरून किडींची अंडी शोधतात. प्रत्येक मादी ट्रायकोग्रामा अनेक अंड्यांचे परजीवीकरण करू शकते. परिणामी अळी तयार होत नाही आणि पिकांचे नुकसान टळते. यामुळे ट्रायकोकार्ड हे कीड आल्यानंतर उपचार करण्याऐवजी कीड येण्यापूर्वी प्रतिबंध करणारे तंत्रज्ञान ठरते.

**कोणत्या पिकांसाठी उपयुक्त?**



ट्रायकोकार्डचा वापर खालील पिकांमध्ये प्रभावी ठरतो

**कापूस**- गुलाबी बोंडअळी, अमेरिकन बोंडअळी

**भात** - पिवळा खोडकिडा

**मका** - फॉल आर्मीवर्म

**तूर व हरभरा** - शेंगा पोखरणारी अळी

**ऊस** - खोडकिडा

**टोमॅटो, वांगी, मिरची** - फळ पोखरणाऱ्या अळ्या

**ट्रायकोकार्ड वापरताना लक्षात ठेवावयाच्या बाबी**

## शाश्वत शेतीकडे वाटचाल

१. ट्रायकोकार्ड ताजे व योग्य गुणवत्तेचे असावे. कार्डावरील परजीवीकरण झालेली अंडी काळसर, काळी झालेली दिसतात.

२. कार्ड सावलीच्या ठिकाणी व थंड वातावरणात ठेवावे. थेट सूर्यप्रकाशात ठेवू नये.

३. कार्ड मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर शेतात सोडावे; अनावश्यक विलंब टाळावा.

४. कार्ड शेतात पिकाच्या पानांवर, खोडावर, पिकाच्या आतील भागात लावावे, जेणेकरून ते थेट उन्हापासून व पावसापासून सुरक्षित राहील.

५. कार्ड लावताना परजीवी अंडी असलेला भाग वरच्या बाजूस राहील, याची काळजी घ्यावी.

६. शिफारशीनुसार योग्य संख्या व अंतरावर कार्डांचे तुकडे शेतात वितरित करावेत.

७. ट्रायकोकार्ड लावल्यानंतर रासायनिक कीटकनाशकांची फवारणी शक्यतो टाळावी, कारण त्याचा ट्रायकोग्रामा परजीवीवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

८. फवारणी आवश्यक असल्यास ट्रायकोग्रामा व इतर जैविक घटकांवर कमी परिणाम करणारी निवडक कीटकनाशके आणि कृषी तज्ज्ञांच्या शिफारशींचा वापर करावा.

९. पाऊस, अतितीव्र ऊन किंवा जोरदार वाऱ्याच्या काळात कार्ड लावणे टाळावे.

१०. कार्ड लावल्यानंतर शेतात किडीची संख्या व पिकाची स्थिती नियमितपणे निरीक्षणात



ठेवावी.

११. ट्रायकोकार्डचा उपयोग एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा एक घटक म्हणून करावा, केवळ ट्रायकोकार्डवर अवलंबून राहू नये.

१२. उत्पादन, साठवणूक व वापराची तारीख तपासूनच कार्डांचा वापर करावा.

**ट्रायकोकार्डचे प्रमुख फायदे**

१. रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होतो. पिकावरील किडींचे जैविक पद्धतीने नियंत्रण करता येते.

२. पर्यावरणपूरक पद्धत - माती, पाणी व पर्यावरणावर घातक परिणाम कमी होतो.

३. उपयुक्त मित्रकीटकांचे संरक्षण - परागीभवन करणारे व इतर नैसर्गिक मित्रकीटक तुलनेने सुरक्षित राहतात.

४. किडीच्या सुरुवातीच्या अवस्थेत प्रभावी नियंत्रण - ट्रायकोग्रामा परजीवी किडींच्या अंड्यांमध्ये परजीवीकरण करून त्यातून किडीची पुढील पिढी तयार होण्यास प्रतिबंध करते.

५. एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी उपयुक्त - आयपीएम २ मध्ये जैविक नियंत्रणाचा प्रभावी घटक म्हणून वापर करता येतो.

६. पिकावरील अवशेष कमी होण्यास मदत - रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी झाल्याने कृषी उत्पादनातील कीटकनाशक अवशेष कमी ठेवण्यास मदत होते.

७. शेतकर्यांसाठी वापरण्यास सोपे - कार्ड शेतात योग्य ठिकाणी लावणे सोपे असून विशेष यंत्रसामग्रीची आवश्यकता नसते.

८. किडीची संख्या नियंत्रित ठेवण्यास मदत - विशेषतः अंडी अवस्थेतील किडींचे नियंत्रण करून प्रादुर्भाव वाढण्यास आळा बसतो.

९. पिकाच्या सुरक्षित उत्पादनास हातभार - पर्यावरणपूरक पद्धतीने कीड व्यवस्थापन केल्यामुळे सुरक्षित व गुणवत्तापूर्ण उत्पादनास मदत होते.

१०. दीर्घकालीन शाश्वत शेतीसाठी उपयुक्त - रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करून शाश्वत शेतीला प्रोत्साहन मिळते.

### शाश्वत शेतीसाठी प्रभावी पर्याय

हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च आणि सुरक्षित अन्नाची गरज लक्षात घेता ट्रायकोकार्डचा वापर भविष्यात अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. ट्रायकोकार्ड हा चमत्कारिक उपाय नसला तरी योग्य वेळी, योग्य प्रमाणात आणि एकात्मिक कीड व्यवस्थापनासोबत वापरल्यास तो अत्यंत प्रभावी ठरतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी या जैविक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून उत्पादन खर्च कमी करणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करणे ही काळाची गरज आहे.

**हे लक्षात ठेवा**

- अधिकृत स्त्रोतांकडूनच ट्रायकोकार्ड खरेदी करा.
- फेरोमोन सापळ्यांच्या आधारे वापराची वेळ ठरवा.
- अंडी अवस्थेत नियंत्रण हा यशाचा मंत्र आहे.
- रासायनिक कीटकनाशकांचा विवेकी वापर करा.
- आयपीएम २ सोबत ट्रायकोकार्डचा अवलंब करा.

●●●

**- डॉ. स्वाती संत**
प्रकल्प अधिकारी (कीटकशास्त्र), नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई

❍ संयोजक : **निखिल रमेश यादव,** कृषी पदव्युत्तर - ८४०८९१२७०६ ❍

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# किनवटमध्ये पोलीस प्रशासनाचा मध्यरात्री मोठा फेरबदल

## गणेश कराड यांची नियंत्रण कक्षात तर जगदिश मंडलवार यांच्याकडे किनवट पोलिस ठाण्याची सूत्रे

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २ सप्टेंबर -**

मागील काही दिवसांपासून किनवट पोलिस स्टेशन अंतर्गत सुरु असलेल्या वादंगाचा पोलिस प्रशासनाने मंगळवारी मध्यरात्री मोठी प्रशासकीय फेरबदलाची कारवाई करुन शेवट केला आहे. किनवट पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गणेश कराड यांची कंट्रोल रूमम ध्ये बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी कंट्रोल रूमचे जगदिश मंडलवाड यांची किनवट पोलिस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे.



या कारवाईच्या केंद्रस्थानी आदिवासी महिला श्रीमती राधिका शामराव गायकवाड यांचे आंदोलन राहिले. गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहाच्या स्वयंपाकगृहात कार्यरत असलेल्या गायकवाड यांनी २० व २१ ऑगस्टदरम्यान बालाजी केंद्रे, रा. कोपरा यांच्याविरुद्ध विनयभंग व आदिवासी महिला म्हणून अवमान केल्याची तक्रार करण्यासाठी किनवट पोलिस ठाणे गाठले होते. मात्र, आपल्याला दिवसभर पोलिस ठाण्यात बसवून ठेवण्यात आले आणि गुन्हा दाखल करण्यात आला नाही, असा आरोप त्यांनी केला होता. तसेच प्रकरण मिटवून टाकण्यासाठी काही व्यक्तींनी आपल्यावर दबाव आणल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणी आदिवासी समाजाच्या प्रतिनिधी मंडळाने जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. रोहन निलभ व उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्याकडे निवेदन देऊन पोलिस निरीक्षक गणेश कराड यांना सहआरोपी करून ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र, अपेक्षित निर्णय न झाल्याने श्रीमती गायकवाड यांनी १ सप्टेंबरपासून उपोषण सुरू केले आणि मागण्यांवर निर्णय न झाल्यास २ सप्टेंबर रोजी आत्मदहनाचा इशारा दिला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने रात्रीतून हालचाली करत कराड यांची बदली केली. दरम्यान, २ सप्टेंबर रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर कदम व नवनियुक्त पोलिस निरीक्षक जगदिश मंडलवाड यांच्या उपस्थितीत श्रीमती गायकवाड यांचे उपोषण सोडविण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जनाबाई डुडुळे, विद्यार्थी कृती समि तीचे प्रदेशाध्यक्ष विकास कुडमते, आदिवासी नेते प्रा. विजय खुपसे, आदिवासी नेते गोपिनाथ बुलबुले, भाजपाचे जिल्हा सरचिटणिस प्रा. किशन मिरासे, डॉ. वानोळे, जितेंद्र कुलसंगे यांच्यासह आदिवासी सम ाजाचे पदाधिकारी उपस्थित होते. या घटनेने प्रशासनातील अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता संविधान, कायदा आणि कर्तव्य यांना सर्वोच्च प्राधान्य देऊन निष्पक्ष भूमि का बजावण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

# बार कौन्सिल ऑफ इंडियाचा नांदेडच्या वकिलाबाबत मोठा निर्णय

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ सप्टेंबर -**

गुरुद्वारा बोर्ड, नांदेड येथे कायम स्वरूपी नोकरीत असताना वकिलीची सनद मिळवल्याच्या गंभीर आरोपाशी संबंधित असलेल्या एका जुन्या प्रकरणात बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या जनरल कौन्सिलने मोठा निर्णय दिला असून त्यामुळे वकिली वर्तुळात खळबळ उडाली आहे.

बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अतिरिक्त सचिव अवनीश कुमार पांडे यांनी दि. १७.०८.२०२६ रोजी पत्र क्र. BCI:D: ५४६५/२०२६ (Rev.) अन्वये कळवले आहे की, रिव्हिजन पिटीशन क्र. २०/२०१८ (अमरजीत सिंग बसंत सिंग महाजन विरुद्ध जसपाल सिंग जगजीत सिंग सुखमनी, डव्होकेट) या प्रकरणातील सब-कमिटीचा दि. ०२.०५.२०२६ रोजीचा अहवाल जनरल कौन्सिलने दि. ०९.०५.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत Ratify/pproved केला आहे.

### रिव्हिजन याचिका मंजूर, प्रकरण शिस्तभंग समितीकडे

**प्रकरण काय आहे?**

तक्रारदार सरदार अमरजीत सिंग बसंत सिंग महाजन (रा. बड्पुरा, गुरुद्वारा गेट नं. ४, नांदेड) यांनी तक्रार दाखल केली होती की, प्रतिवादी ॲड. जसपाल सिंग जगजीत सिंग सुखमनी यांनी सन २००४ साली बार कौन्सिलमध्ये नोंदणी (Enrolment) केली तेव्हा ते गुरुद्वारा बोर्ड, नांदेड येथे पगारी कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून कार्यरत होते, जे डव्होकेट क्ट १९६१ च्या नियमांनुसार नियमबाह्य आहे.

यासाठी पुरावा म्हणून गुरुद्वारा बोर्डाच्या अधीक्षकांनी दिलेले दि. २२.०२.२०१८ रोजीचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले होते, ज्यात ड. सुखमनी हे दि. ३१.१०.२००६ पर्यंत बोर्डाच्या सेवेत असल्याचा उल्लेख आहे.

**यापूर्वी काय झाले होते?**

महाराष्ट्र स्टेट बार कौन्सिल, म ुंबईने या तक्रारीची दखल न घेता दि. १३.०४.२०१९ रोजी तक्रार कलम ३५ अन्वये फेटाळली होती. त्याविरोधात सरदार अमरजीत सिंग महाजन यांनी बार कौन्सिल ऑफ इंडियात रिव्हिजन दाखल केली होती.

**बार काउन्सिल ऑफ इंडियाचा अंतिम आदेश काय?**

बार काउन्सिल ऑफ इंडियाच्या सब-कमिटीने आपल्या अहवालात स्पष्ट केले की, _या प्रकरणात सविस्तर चौकशी आणि तपासाची आवश्यकता आहे. स्टेट बार कौन्सिलने हे प्रकरण थेट फेटाळण्याऐवजी शिस्तभंग समि तीकडे चौकशीसाठी पाठवणे अपेक्षित होते.

त्यामुळे बार काउन्सिल ऑफ इंडिया ने रिव्हिजन याचिका मंजूर करून संपूर्ण प्रकरण पुन्हा Secretary, Bar Council of Maharashtra Goa यांच्याकडे पाठवले असून, त्यांना योग्य शिस्तभंग समिती नेम ून संदर्भ तारखेपासून ६ महिन्यांच्या आत निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. सदर प्रकरणात ड. राम पावडे यांनी तक्रारदार सरदार अमरजीत सिंग महाजन यांच्या बाजुने केस लढवली.

या आदेशाच्या प्रमाणित प्रती तक्रारदार सरदार अमरजीत सिंग, संबंधित वकील ॲड. जसपालसिंग जगजीत सिंग सुखमनी आणि महाराष्ट्र बार कौन्सिल म ुंबईला पाठवण्यात आल्या आहेत. आता या प्रकरणाचा अंतिम फैसला राज्याच्या शिस्तभंग समितीसमोर होणार आहे.

## एसजीजीएसच्या विद्यार्थ्याची सीएनसीएफ एलएफएक्स मेंटरशिप प्रोग्रामसाठी निवड

**नवीन नांदेड** -श्री गुरु गोबिंदसिंघजी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी विष्णुपुरी, नांदेड येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी अथांग काळी यांची क्लाउड नेटिव्ह कम्प्युटिंग फाउंडेशन अंतर्गत



एलएफएक्स मेंटॉरशिप प्रोग्राम सीएनसीएफ टर्म - ३, २०२६ साठी निवड झाली आहे. अथांग काळी यांची सीएनसीएफ हेडलॅम्प या प्रकल्पासाठी निवड झाली असून, या प्रकल्पांतर्गत ते किव्हर्नो पॉलिसी व्हिज्युअलायझेशन अँड ऑपरेशनल एन्हान्समेंट्स या विषयावर काम करणार आहे. या तीन महिन्यांच्या मेंटरशिप दरम्यान त्यांना जागतिक स्तरावरील मुक्त स्रोत प्रकल्पात योगदान देण्याची संधी मिळणार असून, मायक्रोसॉफ्ट मधील अनुभवी सॉफ्टवेअर डेव्हलपर्स आणि मेंटर्सकडून त्यांना मार्गदर्शन मिळणार आहे.अथांग काळी या विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशा बद्दल एस. जी. जी. एस. अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड चे नियमक मंडळाचे अध्यक्ष प्रशांत पौळ, नियमक मंडळाचे सदस्य अमोल महामुनी, बाबा सुखविंदर सिंघजी, संजय लाठकर, सुरेश जोंधळे, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई चे संचालक तथा नियामक मंडळाचे सदस्य डॉ.प्रमोद नाईक, प्रा. डॉ विक्रम गद्रे, डॉ. अभिजित नांदेडकर, डॉ. जयश्री वाघमारे तसेच संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. संदीप मुंढे, इलेक्ट्रोनिक्स अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनील जत्ती, सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या आगामी मेंटरशिपसाठी तसेच तंत्रज्ञान आणि मुक्त स्रोत सॉफ्टवेअर क्षेत्रातील भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# कृषी सेवा महासंघाचे शासनाविरोधात एल्गार; ३ सप्टेंबरपासून टप्प्याटप्प्याने कामबंद आंदोलनाची हाक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ सप्टेंबर -**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने तयार केलेल्या अपारदर्शक आणि अतांत्रिक प्रस्तावित आकृतीबंधाविरोधात महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. या आकृतीबंधामुळे शेतकरी, कृषी विद्यार्थी व तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या हिताला बाधा पोहोचत असल्याचा आरोप करत महासंघाच्या वतीने उद्या दिनांक ०३ सप्टेंबर २०२६ पासून राज्यव्यापी 'लेखणी बंद' आंदोलन पुकारण्यात आले आहे.या आंदोलनामुळे राज्यातील कृषी विभागाचे सर्व अहवाल संकलन व प्रशासकीय कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे.



महासंघाने यापूर्वी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच कृषी मंत्र्यांकडे निवेदने देऊनही आणि कृषी महासंघाची कृषी आयुक्त यांच्या दि.२८ ऑगस्टच्या व सचिव कृषी यांच्या ३१ ऑगस्ट च्या बैठकीत योग्य ती बाजू मांडूनही प्रशासनाने योग्य ती दखल न घेतल्याचे आक्षेप नोंदवत हे राज्यव्यापी तिव्र आंदोलन हाती घेतले आहे. व दिनांक ७/९/२०२६ रोजी सामूहिक रजा देऊन कृषी आयुक्त कार्यालय पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात तालुका कृषी अधिकारी नांदेड संजय चातरमल, तंत्र अधिकारी पूनम चातरमल मॅडम, मंडळ कृषी अधिकारी सुनील सानप, दीपक नागुरे, उप कृषी अधिकारी विनोद देशमुख, सोनाली शिंदे, लक्ष्मण चचुवार, सुप्रिया शिंदे, सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेचे वसंत जारीकोटे, तालुकाध्यक्ष दत्ता भुते, तालुका सचिव विजयकुमार पाटील, कार्याध्यक्ष बालाजी होणवडजकर, तालुका कोषाध्यक्ष कैलास पेरके, प्रल्हाद येवते, संभाजी वाघम रे,अश्विनी वासलवार,अर्चना मोरे, विनिता सर्वज्ञ, सलमा बेगम पाळेकर, माधुरी राजुरकर, सुरेखा शिंदे, सविता जारिकोटे, दिपाली मोरे, वनमाला मोरताडे, गंगासागर क्षीरसागर आदीसह सर्व तांत्रिक संवर्ग संघटनेचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# महिला हीच कुटुंबाच्या अर्थनियोजनातील खरी नियोजक : डॉ. पूजा गायकवाड

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २ सप्टेंबर -**

मर्यादित उत्पन्नातून मुलांचे शिक्षण, आरोग्य, शेती, दैनंदिन खर्च आणि भविष्यासाठी बचत यांचा समतोल साधत कुटुंबाच्या अर्थनियोजनात महिला महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे महिला हीच कुटुंबाच्या अर्थनियोजनातील खरी नियोजक असून, तिची आर्थिक साक्षरता वाढणे म्हणजे कुटुंबाच्या भवितव्याला बळ मिळते, असे प्रतिपादन डॉ. पूजा सचिन गायकवाड यांनी केले.

क्रेडिटक्सेस ग्रामीण लिमिटेड व क्रेडिटक्सेस इंडिया फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित सामाजिक-



आर्थिक विकास व आर्थिक साक्षरता कार्यशाळेत प्रम ुख पाहुण्या म्हणून डॉ. पुजा गायकवाड यांनी महिलांना मार्गदर्शन केले. बचत, आर्थिक नियोजन, कर्जाचा योग्य वापर, बँकिंग व ऑनलाइन व्यवहारातील सुरक्षितता याबाबत त्यांनी माहिती दिली.

याप्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी वैभव पडवळ, विभागीय व्यवस्थापक मोहन खिचडे, क्षेत्र व्यवस्थापक रमेश अंबालगुंडे आणि शाखा व्यवस्थापक जाहूर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनीही या कार्यशाळेत महिलांना आर्थिक साक्षरतेसंबधी मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. पुजा सचिन गायकवाड यांनी अतिशय सविस्तरपणे मार्गदर्शन केले. ते बोलताना पुढे म्हणाल्या, कर्ज घेणे चुकीचे नाही; मात्र कर्जाचा उद्देश आणि त्याच्या अटी समजून घेणे आवश्यक आहे. कर्जाचा उपयोग व्यवसाय, शेती, पशुपालन, मुलांचे शिक्षण किंवा उत्पन्न वाढविण्यासाठी करावा. आपल्या क्षमतेपेक्षा अधिक कर्ज घेऊ नये. कर्ज घेण्यापूर्वी व्याजदर, हप्ते आणि परतफेडीच्या अटी समजून घेऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करावी, असा सल्ला त्यांनी दिला.

या कार्यशाळेला मोठ्या संख्येने महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. महिलांनी आर्थिक नियोजन, कर्ज व्यवहार, आरोग्य आणि म ुलांच्या शिक्षणासंदर्भातील मार्गदर्शन जाणून घेत सक्रिय सहभाग नोंदविला. महिलांना माहितीच्या माध्यमातून सक्षम करून त्यांच्या निर्णयक्षमतेला बळ देणारी ही कार्यशाळा सकारात्मक आणि प्रेरणादायी ठरली, अशी भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

## जाफर आदमपूरकर शालेय शिक्षण समितीत शिक्षणतज्ज्ञ सदस्य पदी

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी कवी,गीतकार व पञकार जाफर फक्रूशा आदमपूरकर यांची नुकतीच शालेय व्यवस्थापन शिक्षण समितीत सन्मानाने 'शिक्षणतज्ज्ञ सदस्य' पदी बिनविरोध निवड करण्यात आली.येथील जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शेषेराव व्यंकटराव पांचाळ यांनी शैक्षणिक चालू सत्राकरिता शालेय व्यवस्थापन शिक्षण समिती पदाधिकारी निवडीची पालक सभेत घोषणा केली होती.त्या अनुषंगाने गावकरी पालकवर्ग व प्रतिष्ठित नागरिक,शालेय शिक्षकवृंद यांच्या एकत्रित वैचारिक निर्णयाने समितीत 'शिक्षणतज्ज्ञ सदस्य' पदी बिनविरोध निवड जाहीर केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शेषेराव पांचाळ,सहशिक्षक राहूल रानोजी भद्रे,विठ्ठल अंगरोड,सहशिक्षिका सौ.स्वाती अडबलवार,सौ.कल्पना जाधव,सौ.अर्चना जळपतराव, सेवक शिवराम इंगळे,शालेय व्यवस्थापन शिक्षण समिती अध्यक्ष बाळू डोंपे,उपाध्यक्ष राजेंद्र कोल्हे,सरपंच प्रतिनिधी कपिल भुसावळे,म ाजी सरपंच अरविंद पेंटे,कंत्राटदार बाबुराव हलबुर्गे,तंटामुक्ती अध्यक्ष प्रतिनिधी राम हलबुर्गे,माणिकराव पाटील, कपिल भुरे,आकाश इंगळे,शिवानंद झेलते,रणजित शिनगारे,बाबाराव देवारे,शेख आमि रसाब,मष्णा कोल्हे,मारोती पेंटे, अनिल हलबुर्गे व उपस्थित गावकरी मित्र मंडळींकडून निवडीबद्दल अभिनंदन करण्यात आले.



## डॉ. गंगाधर सोंडारे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**नांदेड**-येथील प्रतिष्ठित नागरिक डॉ. गंगाधरराव सोंडारे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशनचा नामांकित महाराष्ट्र शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष सुधीर कांबळे व माता रमाई आंबेडकर यांच्या वंशज शुभांगी धोत्रे यांनी दिले आहे. मुंबई येथे होणाऱ्या दिम ाखदार कार्यक्रमांमध्ये अँड. अजय तापकीर, गौतम पगारे ड. कीर्ती हिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन तर्फे राज्यभरातील नामांकित लोकांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत महाराष्ट्र शैक्षणिक सामाजिक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये प्रतिष्ठित व्यक्ती असलेले डॉक्टर गंगाधर रावजी सोंडारे यांची वर्ष २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. डॉ. सोंडारे यांना यापूर्वी सत्यशोधक विचार मंच, महात्मा फुले सत्यशोधक, सामाजिक प्रेरणा पुरस्कार, इंदिरा गांधी सद्भावना पुरस्कार तसेच राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. यासह विविध सामाजिक संघटनांनी महान विभूतींच्या नावाने अनेक पुरस्कार प्रदान केले आहेत. डॉ. गंगाधररावजी सोंडारे यांना युनिव्हर्सिटी ऑफ टोलोसा मेक्सिको अमेरिकेने २०२३ मध्ये मानद डॉक्टरेट पदवी देवून गौरव केलेला आहे. नांदेड जिल्हा काँग्रेस आय कमिटीचे कार्याध्यक्ष गंगाधर सटवाजीराव सोंडारे बोरगावकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# नायगांव संघातील मतदार यादी झाली, प्रसिद्ध तुमचे नांव आहे ना याची खात्री करा ; बालाजी बच्चेवार यांचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २ सप्टेंबर -**

नायगांव विधानसभा मतदार संघातील प्रारूप मतदार यादी सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूकपणे नोंदलेले असणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने मतदारांनी यादीची पाहणी करून आपल्या नावासह पत्ता व इतर तपशीलांची खात्री करून घ्यावी, असे आवाहन भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बालाजी बच्चेवार यांनी केले आहे.



प्रसिद्ध झालेली प्रारूप मतदार यादी संबंधित मतदान केंद्रांवर तसेच मतदार नोंदणी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात नागरिकांच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे नायगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी आपल्या नावाची मतदार यादीत नोंद आहे किंवा नाही, याची शहानिशा करावी. नाव समाविष्ट नसल्यास ते नोंदविण्यासाठी, मतदार यादीतील एखाद्या नावाच्या समावेशास आक्षेप असल्यास किंवा नाव, पत्ता अथवा इतर तपशिलात दुरुस्ती आवश्यक असल्यास संबंधित नागरिकांनी ३० सप्टेंबर २०२६ किंवा त्यापूर्वी विहित नमुन्यात दावा अथवा हरकत दाखल करावी.

तसेच, १ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांनाही मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध आहे. यासाठी फॉर्म क्रमांक ६ द्वारे दावा दाखल करता येणार आहे. मतदार यादीतील नाव वगळण्यासाठी किंवा एखाद्या नावाच्या समावेशास हरकत नोंदविण्यासाठी फॉर्म क्रम ांक ७, तर नाव, पत्ता किंवा अन्य तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी फॉर्म क्रमांक ८ वापरता येणार आहे.

दावे व हरकती संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात किंवा संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (इडज) यांच्याकडे दाखल करता येतील. संबंधित तालुक्यांमध्ये सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले असून, म तदार यादीतील भागनिहाय दावे व हरकतींवर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

मतदान हा प्रत्येक पात्र नागरिकाचा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार आहे. त्यामुळे कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव म तदार यादीतून वंचित राहू नये आणि मतदार यादीतील नोंद अचूक राहावी, यासाठी नागरिकांनी केवळ निवडणुकीच्या काळात नव्हे तर आत्ताच आपले नाव तपासणे आवश्यक आहे. प्रारूप मतदार यादीत कोणतीही त्रुटी आढळल्यास किंवा नाव समाविष्ट करावयाचे असल्यास विहित मुदतीत आवश्यक दावा अथवा हरकत दाखल करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बालाजी बच्चेवार यांनी केले आहे.

# अखेर त्या शेतकऱ्याने संपवली जीवन यात्रा

**तभा वृतसेवा**
**सोनखेड, दि. २ सप्टेंबर -**

भेंडेगाव येथील शेतकरी अंकुश नाना लिंबटकर यांनी ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ च्या दरम्यान गळफास घेऊन जीवन यात्रा संपवल्याची दुर्दैवी घटना घडली.

रोजगार हमी योजनेअंतर्गत भेंडेगाव येथील शेतकरी अंकुश नाना लिंबटकर यांनी आपल्या शेतात विहीर घेतली होती त्या विहिरीचे पूर्ण काम होऊनही कामाची सर्व कागदपत्रे मोजमाप मंजुरी, हजेरी,मंजुरी नोंदी,बिलाची स्थिती हे सर्व दाखल केल्यानंतरही त्या शेतकऱ्याचे रीतसर देयके काढण्यासाठी गावातील रोजगार हमी योजनेच्या रोजगार सेवकाने त्या शेतकऱ्या कडून एक लाख रुपयाची आर्थिक पिळवणूक केल्याचे निवेदन त्या शेतकऱ्याने १४ ऑगस्ट रोजी गटविकास पंचायत समिती लोहा यांच्याकडे अर्जाद्वारे चौकशीची म ागणी केली होती त्यानंतर त्रिसदस्य समिती गठीत करून त्याची चौकशीही करण्यात आली परंतु त्या चौकशीचा अहवाल येण्यापूर्वीच

भ्रष्टाचाराने बरबटलेल्या शासन व्यवस्थेला कंटाळून शेतकऱ्याने ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहाच्या दरम्यान आपल्या स्वतःच्या शेतात चिमणसागाच्या झाडाला गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपवली त्यामुळे त्यांना आत्महत्येस प्रवर्त केल्याप्रकरणी त्यांच्या पत्नी फिर्यादी मिनाबाई अंकुश लिंबटकर यांच्या तक्रारीवरून अविनाश चांदू कांबळे रोजगार सेवक भेंडेगाव ता.लोहा जिल्हा नांदेड याच्या विरुद्ध गु.र.नं २०७/२६ कलम १०८,३५१,३५१,(२),(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन तात्काळ अटक करण्यात आहे पुढील तपास सपोनी भागवत नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक कुमार हंबर्डे हे करीत आहेत.

# लोहा तालुक्यात अवैध वाळू वाहतूक जोमात

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २ सप्टेंबर -**

लोहा तालुक्यात गोदा काटावरील विविध भागांतून अवैधरीत्या वाळू उत्खनन व वाहतूक सुरू आहे, या प्रक्रीयमुळे शासनाचा महसूल बुडत आहे.दलाल व महसुल प्रशासनची मिली भगत आहे काय अशी नागरिकांकडून बोलले जात आहे. नदीपात्रातून नियमबाह्य पद्धतीने वाळू उपसा करून ट्रॅक्टर, टिप्पर व इतर वाहनांतून वाहतूक होत आहे अनेक ठिकाणी रेती साठवली आहे या वर जिल्हा पोलिस अधिक्षक कारवाई केंव्हा करणार अशी चर्चा स्थानिक पातळीवरुन होत आहे.

**अवैध रेती वाहतुक रात्रीच्या वेळी जोमात**

अवैध वाळू वाहतुकीसाठी काही ठिकाणी रात्रीच्या वेळेचा वापर केला जात असल्याचे नागरिकांतुन बोलले जात आहे. महसुल प्रशासन व पोलिस प्रशासनाच्या तपासणीला टाळण्यासाठी अवैध रेती वाहातुकवाले दुर्गम रस्ते,आड् मार्गांचा वापर केला जातो यामुळे ग्रामीण भागातील रस्त्ये खडेच खड़े पडले आहेत या वाहातुकीला अनेक गावक-याच्या तक्रारी होता आहेत, गावातील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात खराब होत असून,या म ार्गावरुन ये जा करण्यासाठी नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

**दलालाकडुन जानून बुजून शासनाचा महसूल बुडविण्याची शक्यता**

वाळू उत्खनन व वाहतुकीसाठी शासनाने निश्चित केलेले नियम व परवाना व्यवस्था असताना विनापरवाना वाळू वाहतूक होत असल्यास शासनाच्या महसुलाचे नुकसान होऊ शकते. तसेच नदीपात्रातील अनधिकृत उत्खननामुळे पर्यावरणावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता होता आहे.

**जिल्हा पोलिस अधिक्षक अवैध धंद्यावर कारवाई केंव्हा करणार ?**

अवैध वाळू वाहतुकीवर महसूल विभाग, तहसील प्रशासन व संबंधित पथकांची अवैध रेती वाहातुकीवर करडी नजर आसताना अवैध रेती वहातुक दलाल बिनदिकत वाहातुक कशी करतार यावर जिल्हा पोलिस अधिक्षकाची कारेवाही कधी होणार याकडे नागरिकाचे लक्ष लागले आहे अवैध धंद्याला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबवून म हसुल पथक,स्थानिक पोलिस पथकाची नियुक्ती केली पण हे पथक रात्रभर नॉट रिचेबल आसते सकाळी सकाळी गुड मार्निंग करायाला अंबर दिवा लावुन शासनादेश वहान भर वस्तीत किव्हा चौकात थांबवून सकाळी,सकाळी दलाल सोबत चहा नाष्टा करण्यासाठी येणा-या जाना-याला या ठिकाणी बसलेत असे दिसावे आशा जागी टेबल लावून बसतात या पथकाची चौकशी करावी यावर विभाग प्रमुखानी कारेवाही करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे. विन नंबर ,संशयित वाहनांची तपासणी करून आवश्यक कागदपत्रे तपासावीत आणि नियमांचे उल्लंघन केलेले आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होता आहे.

तसेच वाळू उत्खननाची ठिकाणे, वाहतुकीचा मार्ग आणि रात्रीच्या वेळी होणारी वाहतूकीवर दलालाने जम बसविला आहे या घटनेकडे जिव्हा पोलिस व जिल्हा महसुल लक्ष द्यावें या प्रकाराकडे प्रशासनानाची पकड़ सैल झाली काय अशी चर्चा नागरिकातुन होत आहे.